छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३४ । वर्ष १३ अंक ६
मूल्य रुपये पंधरा



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !



स्वप्न होत असे साकार...

फूल कळीचे होताना ये, पानांतुन उद्गार
स्वप्न गोजिरे समोर आता, होत असे साकार... ।।ध्रु. ।।

सर्वपरींनी फुलून येता, जग ही उमजावे
भल्याबुऱ्या वाऱ्याच्या सोबत, स्वत:स जाणावे
अमंगलाला परतवण्याचा, अमुचा दृढ निर्धार... ।।१ ।।

बिकट वाट अन् उपवाटांची, उंच सखल वळणे
दिशाभूल करणारा चकवा, त्यास तरून जाणे
अनुभव गाठी बांधुन आता, सर्वदूर संचार... ।।२ ।।

समभावाचा, माणुसकीचा ओघ वाहतो जिथे
स्वातंत्र्याचा मुक्त मोकळा झरा वाहतो तिथे
नव्या युगातिल समतोलाचा इथेच साक्षात्कार... ।।३ ।।

– आश्लेषा महाजन

ऐकाऽ हो ऐकाऽऽ 'छात्र प्रबोधन' आता संगणकावर पाहा/ऐका

छात्र प्रबोधनच्या अंकातील शेजारील चौकट ज्या लेखांच्या सुरुवातीला दिली आहे त्या लेखांशी निगडित ऑडिओ/व्हिडिओ इंटरनेटद्वारा आपल्या संगणकावर कसे पाहावे याच्या सूचना पान क्र. १० वर दिल्या आहेत. त्याप्रमाणे कृती करा आणि व्हिडिओ पाहा व लेखाच्या वाचनाबरोबरच जास्तीचा आनंद लुटा.

ActiveLink Tag No.	ऑडिओ/व्हिडिओ पाहा.

विद्यार्थ्यांना परीक्षेतील सुयशासाठी छात्र प्रबोधनतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !!

सुट्टीत 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात कामाला या ! जोडीकार्यात सहभागी व्हा !!

छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३४। वर्ष १३ अंक ६

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २४८ वा अंक, वर्ष २१ अंक ८

प्रकाशन दिनांक - १० फाल्गुन, शके १९३४/१ मार्च २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२.	**संवाद**	- महेन्द्र सेठिया
३.	कथा ... **शामाताईंची शाबासकी!!**	- शैलजा देशपांडे
५.	माहितीपर... **संख्याना करूया सख्या**	- रोहिणी डाके
८.	कविता... **सांजवेळ**	- सूर्यकांत मालुसरे
९.	ललित...**दुर्ग साहित्य संमेलन**	- आनंद पाळंदे
११.	माहितीपर... **लाउड कम्प्युटिंग**	- आराधना देशमुख - डॉ. कांचनगंगा गंधे
१३.	माहितीपर ... **घरच्याघरी सायकल दुरुस्ती**	- ऋषिकेश पाळंदे
१५.	कथा ... **शरणागत**	- अनु. नीलिमा करमरकर
२०.	कविता... **आई आणि पर्यावरण**	- प्रभाकर साळेगावकर
२१.	अभ्यासातील स्वावलंबन... **परीक्षेला सामोरं जाताना...**	- डॉ. संज्योत देशपांडे
२३.	**कार्य - प्रात्यक्षिके**	- आकाश चौकसे
२४.	ललित... **थेंबे थेंबे तळे साचे**	- एकनाथ आव्हाड
२७.	मुलांचे पान... **दृष्टिकोन आपला आपला**	- चि. शौनक हिंगे
	मधली सुट्टी	- कु. पूजा वाबळे
२९.	निर्णयातील स्वावलंबन...३ **निर्णय कौशल्य**	- शैलजा देशमुख
३२.	**माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'**	

याशिवाय - जरा डोकं चालवा(७), सूडोकू (८), पोपट परतुनि आला (१९), 'इको फ्रेंडली' रंग (२६), करून तर पाहा (३१), अभिनंदन !(३२)

मुखपृष्ठाविषयी - जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एका विद्यार्थिनीचा प्रातिनिधिक चेहरा चित्रात दिसतो आहे. समाजात आज अनेक दुर्दैवी घटना घडताना दिसतात; पण त्यावर मात करीत आपल्याला सकारात्मक विचाराने प्रगती साधायचीच आहे, हा विचार दर्शविण्यासाठी त्याच्या पार्श्वभूमीवर तिला खुणावणारी विविध क्षेत्रं दिसतात. हे चित्र काढताना रंगीत पेन्सिल माध्यमाचा वापर केला आहे व कागदाच्या पोताचा वापरही चित्राला पूरक ठरला आहे.

- गोपाळ नांदुरकर

Tag No. CP130619 ActiveLink | चित्र तयार होतानाचा व्हिडिओ पाहा

Tag No. CP130626 ActiveLink | **गीत ऐका**

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य
स्वप्न होत असे साकार

- आश्लेषा महाजन

♦ **संपादक, प्रकाशक, मुद्रक** ♦
महेन्द्र सेठिया

♦ **कार्यकारी संपादक** ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ **संपादक मंडळ** ♦
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

♦ **मुखपृष्ठ** ♦
गोपाळ नांदुरकर

♦ **आतील चित्रे** ♦
ऋजुता घाटे, तेजस्वी भुरके

♦ **संपर्क पत्ता** ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

ऐकाऽ हो ऐकाऽऽ

'छात्र प्रबोधन' मधील साहित्याला
'ऑडिओ-व्हिडीओ'
ची पूरक जोड !!
संगणकावर पाहा/ऐका

तपशीलासाठी -पृष्ठ क्र. १० वर पाहा.

मासिकाची वर्गणी : वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०, त्रैवार्षिक: ₹ ५००, दशवार्षिक: ₹ १,५००. **या अंकाची किंमत : ₹ १५** (पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

सारे सत्याचे, शिस्तीचे मित्र बनू रे । सदा कर्माचा, ध्येयाचा ध्यास धरू रे ।।

दिल्लीच्या पहिल्या महिला महापौर - **अरुणा असफअली**

प्रिय लाड या, प्रज्ञावंत प्रबोधकांनो, **संवाद**

मागच्या महिन्याचा अंक वाचला का? एका नवीन कल्पनेला, प्रयोगाला आपण सुरूवात केली, हे कळलं का? छापील अंकातील काही लेखांना दृक्-श्राव्य माध्यमाची जोड देण्यासाठी आंतरजाळ्याच्या (इंटरनेट) साहाय्यानं काही गोष्टी तुम्हाला पाहाण्यासाठी/ऐकण्यासाठी दिल्या होत्या. तुम्ही किती जणांनी ते पाहिलं? मुळात तुमच्यापैकी किती जणांच्या घरी 'इंटरनेट' सुविधा आहे, (संगणकावर वा भ्रमणध्वनीयंत्रावर) हे आम्हाला कळू शकेल का? या महिन्यात छात्र प्रबोधनच्या 'ई-संपर्क' पत्त्यावर एक ई-पत्र लिहून पाठवाल का? तुमचे नाव, गाव, व इयत्ता जरूर कळवा.

हा प्रयोग आपण ३ महिने चालू ठेवणार आहोत. याही अंकात तुम्हाला काही खास गोष्टी पाहायला मिळतील. मुखपृष्ठ काढतानाचे चलचित्रण, नैसर्गिक रंग कसे तयार करायचे याचे चलचित्रण अशा छान छान 'व्हिडीओ क्लिप्स' खास तुमच्यासाठी तयार केल्या आहेत, तेव्हा त्या आवर्जून पाहा. आणि आम्हाला प्रतिसाद द्यायला विसरू नका. तुमच्या प्रतिसादावर हा प्रयोग नियमित चालू ठेवायचा की नाही, हे ठरणार आहे बरं का ! तुम्हा लाडक्या प्रबोधकांकडून प्रतिसादाची अपेक्षा नाही करायची, तर मग कोणाकडून करायची?

या महिन्यात ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे एका राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. विषय होता 'प्रज्ञावंतता-शोध, संवर्धन आणि उपयोजन.' भारतभरातून ३०० पेक्षा अधिक तज्ज्ञ, अभ्यासू, जिज्ञासू मंडळी यामध्ये सहभागी झाली होती. त्यानिमित्तानं अनेकांचा परिचय झाला. वरील विषयावरच्या विविध पैलूंवर चर्चा झाल्या. अनेक संशोधन निबंध वाचले गेले. त्यात अहमदाबादच्या डॉ. अनिल गुप्तांची भेट आणि त्यांच्याशी झालेल्या गप्पा विशेष लक्षात राहिल्या. IIM, *अहमदाबाद* (Indian Institute of Management) *या संस्थेमध्ये ते प्राध्यापक आहेत; पण त्यांची खरी ओळख झाली, ती त्यांनी सुरू केलेल्या* Indian Innovation Foundation *या नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबतच्या गप्पांमधून! दरवर्षी भारतातल्या दुर्गम भागात ते एक शोधयात्रा काढतात आणि तेथील माणसांनी शोधलेल्या नावीन्यपूर्ण कल्पनांचं प्रश्न सोडविण्याच्या भन्नाट गोष्टींचं ,वैविध्यपूर्ण पाककृतींचं संकलन करतात. विद्यार्थ्यांसाठी नावीन्यपूर्ण कल्पना काढण्याच्या स्पर्धा घेतात आणि त्यातल्या काही भन्नाट आणि उपयुक्त कल्पनांना पुरस्कारही देतात. गेल्या काही वर्षात तुमच्याच वयाच्या भारतभरात विखुरलेल्या अशा पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांच्या भन्नाट कल्पना लवकरच आपल्या अंकातून तुमच्यापर्यंत नियमितपणे पोहोचतीलच. (प्रत्येक वेळी तुम्हालाही एखादी समस्या सांगितली जाईल आणि तुम्ही तुम्हाला सुचतील त्या भन्नाट व उपयुक्त कल्पना आमच्याकडे पाठवा.)*

प्रत्येक व्यक्ती प्रज्ञावंत आहे. प्रत्येकाच्या प्रज्ञावंततेचं क्षेत्र वेगवेगळं असू शकेल. हे परिषदेतील प्रत्येकजणंच आग्रहानं मांडत होता. मात्र, दुर्दैवानं आपल्या शिक्षण प्रक्रियेमध्ये खूप थोड्या प्रकारच्या प्रज्ञावंतांना आपली प्रज्ञावंतता व्यक्त करण्याची, वाढविण्याची संधी मिळते. त्यामुळे प्रत्येकानंच अनेक अनुभवांद्वारे आपापल्या प्रज्ञावंततेचा शोध घ्यायला हवा. आणि ती लक्षात आल्यावर ती फुलविण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण आणि परिश्रम घ्यायला हवेत. तुम्ही सगळे आता परीक्षेच्या अभ्यासात असणार आहात. पण खरं सांगू, माझा असा अनुभव आहे, की अभ्यास करतानाच सुट्टी कशी घालवायची याच्या अनेक कल्पना सुचतात. या सुट्टीत आपल्यामधली प्रज्ञावंतता शोधण्यासाठी, ती वाढविण्यासाठी काय काय करता येईल, याबाबतच्या कल्पना काढा व त्या नोंदवून ठेवा. (त्या कल्पनांमध्ये रमू नका, नाहीतर अभ्यास बाजूलाच राहायचा!) आणि सुट्टीत त्यासाठी आवर्जून वेळ काढा. तुमच्यातली 'प्रज्ञावंतता' शोधण्यासाठी मदत करायला अन् ती विकसित करायलाही 'छात्र प्रबोधन' तर्फे सुट्टीमध्ये जोडीकार्य, गटकार्य , साहस सहल, छात्र प्रबोधनच्या कार्यालयात कामाचा अनुभव, विद्यार्थी संपादक मंडळ अशा अनेक संधी तुम्हाला उपलब्ध आहेत. परीक्षेतील यशासाठी पुस्तकी अभ्यास महत्त्वाचा आहेच. तो उत्तम करून, 'कॉपी न करता' उत्तम गुणांनी तुम्ही उत्तीर्ण व्हावं अन् सुट्टीतल्या 'अनुभव शिक्षणा'साठी सज्ज व्हावं यासाठी शुभेच्छा !

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

सत्य, त्याग, शील, दया, शांतिच्या सन्मार्गी नित जा । चिरायु होऊनी यशोमंदिरी वसे बाळ माझा ।।

जाणून घ्या : इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्षा – **सरोजिनीदेवी नायडू**

प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

शामाताईंची शाबासकी !!

शैलजा देशपांडे

शेवगाव तसं लहानसं गाव. तालु याचं ठिकाण. तिथल्या शाळेचं नाव 'जीवन शिक्षण विद्या मंदीर'; पण सगळीजणं त्या शाळेला 'शामाताईंची शाळा' म्हणूनच ओळखतात. शामाताई सगळ्या मुलांच्या आवडत्या शिक्षिका. मुलांना विचारलं तर मुलं सांगतात, ''शामाताई एकदम टॉप!'' ही सगळी मुलं शामाताईंचंच ऐकणार. आता हेच बघा ना, ताईंनी सांगितलं की 'मैदानात जाताना चपला व्हरांड्यात एका ओळीत काढून ठेवायच्या आणि मग खेळायला जायचं.' सगळेजण चपला एका ओळीत ठेवणार. धाक म्हणून नव्हे, तर असं ठेवलं नाही तर ताईंना ते आवडणार नाही म्हणून! ताईंना कोणत्याही प्रकारे त्रास द्यायचा नाही, हे मुलांनी प कं ठरवलं होतं!

आज रविवार असूनसुद्धा बरीच मुलं शाळेत आली होती. सकाळीच. पुढच्या महिन्यात क्रीडा सप्ताह! आंतरशालेय क्रीडा स्पर्धा! मग त्याची प्रॅ टीस नको करायला? ताईपण आल्या आणि मुलंपण – किट्टू, चिवा, चंब्या, मँगो, पप्या अशी सगळीजण. अरे हो! एक सांगायचंच राहिलं! ही काही या मुलांची खरी नावं नव्हेत. किट्टूचं खरं नाव शुभंकर पटवर्धन. पटवर्धनचं झालं पट्टू आणि पट्टूचं झालं किट्टू. चिराग वाडेकरचं झालं चिवा, मंदार गोडबोलेचं झालं मँगो, चंदन बारट केचं झालं चंब्या आणि पराग रानडेचा पऱ्या. नाव – आडनावाची आद्याक्षरं घेऊन ही नावं तयार झाली. मुलींची सुद्धा अशीच नावं, फ त आडनाव – नाव या क्रमानं! म्हणजे भागवत नीलिमाची झाली भानी आणि देशपांडे सुधाची देसु !!

आज सकाळी सगळेजण मैदानात आपआपला सराव करत होते. ताई आत काही काम करत होत्या. अचानक चिवाचं लक्ष व्हरांड्यात गेलं, तर काय! एक अनोळखी, फाट या कपड्यातला मुलगा व्हरांड्यात आला होता. कोणाचंही लक्ष नाही, असं पाहून त्यानं हळूच एकाच्या चपला पायात घातल्या. आता तो पळणार एवढ्यात चिवा ओरडला,

''ए! काय करतोस?'' तो मुलगा घाबरला. चपला तिथेच टाकून त्यानं पळ काढला. चिवा त्याला धरायला धावला. त्याच्या मागोमाग इतर मुलंसुद्धा धावली. तो फाट या कपड्यातला मुलगा जीव खाऊन पळाला. पण चिवानं त्याला पकडलंच. बाकीची मुलंही आली. तो मुलगा खूप घाबरला. रडू लागला. त्यानं सर्वांची माफी मागितली. गयावया करू लागला. किट्टूनं त्याला सांगितलं,

''आम्ही तुला मारणार नाही, काही करणार नाही; पण तू चोरी करण्याचा प्रयत्न केलास ना? मग आमच्या ताईंना भेट.'' मुलं त्याला घेऊन शामाताईंकडे गेली. भीतीनं त्या मुलाच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. शरमेनं मान खाली घालून तो फ त उभा राहिला. कोणाच्याही नजरेला नजर देण्याची त्याची हिंमत होत नव्हती. ताईंनी त्याला चार समजूतीच्या गोष्टी सांगून घरी पाठवलं. शामाताई कसल्यातरी विचारात मग्न झाल्या. मुलंदेखील आपापल्या घरी परतली.

किट्टू घरी आला तरी त्याच्या डोळ्यांसमोर तो मुलगाच होता. डो यात त्याचेच विचार चालू होते. का केला असेल त्याने चोरीचा प्रयत्न? आणि चोरून चोरल्या त्या जुन्याच चपला? हा गरीब असेल? याच्या बाबांजवळ चपलांसाठी पैसे नसतील? चोरी करण्याची वाईट सवय त्याला लागली असेल का ?

सोड निराशा, झाड आळसा, ध्येय पथा आक्रमी । वाटाड्या हो तुझा तूच, मग तुला कशाचे काय कमी ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय महिला रेल्वे चालक – **सुरेखा यादव (मुंबई – पुणे डे कन वीन, ८ मार्च २०११)**

प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर किट्टूनं सगळ्या मित्र-मैत्रिणीं-समोर हा विषय काढला. किट्टू वर्गाचा मॉनिटर आणि हुशार मुलगा! त्यामुळे बाकीची मुलं त्याचं ऐकायची. किट्टूच्या सांगण्यावरून सर्वांनी ठरवलं, की त्या मुलाचा शोध घेऊन त्याला नवीन चपला देऊ. देसु म्हणाली, ''तो कुठे राहातो ते मला माहीत आहे.''

चंब्या म्हणाला,

''त्यानं माझ्या चपला पळवल्या, म्हणजे माझ्या मापाच्या चपला त्याला बरोबर येतील.''

मग काय? सगळ्यांनी घरच्यांची परवानगी घेतली आणि आपापली मिंटी उघडली. चांगल्या आणि टिकाऊ चपला विकत आणल्या. शामाताईंना सर्व हकीकत सांगितली. ताई खूष! त्यापण मुलांबरोबर वस्तीवर गेल्या.

देसुनं घर दाखवलं. सगळेजण जमले. तो मुलगा घाबरला. त्याच्या आई-वडिलांना काहीच माहीत नव्हतं. शामाताईंनी सर्व हकीकत त्यांना सांगितली. मुलाला थोडासा धीर आला. तो मुलगा ताईंना म्हणाला, ''ताई आजपर्यंत मी कधीच चोरी केली नाही; पण काय करणार माझीपण मजबुरी होती. माझी नड भागवण्यासाठी चपला मी पळवायच्या ठरवल्या.'' त्यानं त्याचे भेगाळलेले-र ताळलेले पाय ताईंना दाखवले. तो पुढे बोलू लागला, ''ताई मला माहिती आहे, चोरी ही चोरीच असते आणि ती वाईटच असते. मी परत चोरी करणार नाही.'' मुलगा चुणचुणीत होता. त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज होती. ताईंनी त्याला जवळ घेतलं. पुढील वर्षी त्यांच्या शाळेत मुलाला दाखल करून घेण्याचं शामाताईंनी ठरवलं. सर्व मुलांनी त्याच्यासाठी आणलेल्या नव्या कोऱ्या चपला त्या मुलाला दिल्या. हे पाहून त्या मुलाचे आणि आई-वडिलांचे डोळे पाणावले. मुलांनी त्याला नाव विचारले.

''प्रविण भुराडे'' मुलगा म्हणाला.

किट्टूने त्याची आद्याक्षरे जोडली आणि म्हणाला, ''अरे हा तर प्रभू!''

आता या सगळ्या मुलांचा प्रभू दोस्त झाला. दुसऱ्या दिवशी शाळेत प्रार्थना झाल्यावर ताईंनी किट्टू आणि त्याच्या मित्र-मैत्रिणींची ही हकीकत इतर मुलांना सांगितला आणि त्या म्हणाल्या,

''एवढी चांगली मुलं आपल्या शाळेत आहेत याचा मला अभिमान वाटतो. स्वत:बरोबर इतरांचाही विचार करणारी ही मुलं गुणी आहेत. उद्या ही मुलं मोठी झाल्यावर चांगले नागरिक होतील. शाळेचं नाव उज्ज्वल करतील. समाजासाठी चांगलं काम करतील.'' बोलता बोलता ताईंचा आवाज कातर झाला. किट्टू आणि कंपनीनेही आवंढा गिळला. शामाताई म्हणाल्या,

''शाब्बास रे माझ्या मुलांनो!'' आणि वर्गातल्या त्या मुलांना वाटलं, की शामाताईंचा हात आपल्या पाठीवर शाबासकीची जणू थाप देतो आहे!

- शैलजा देशपांडे
४ - श्री अपार्टमेंट, मयुर कॉलनी,
स. नं. १३२, कोथरुड, पुणे 411029

हिमालयाचा उन्नत माथा, तशी आमुची उन्नत ध्येये । गंगौघापरि अवखळ आमुची, श्रद्धासरिता निर्मळ वाहे ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय महिला तबलावादक - **डॉ. अबन मिस्त्री**

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६

संख्यांना करूया सख्या

रोहिणी डाके

काय म्हणता, गणित विषयाची भीती वाटते? वर्ग, घनसंख्या या शब्दांनीदेखील बिचकून जायला होतं? मग यावर उपाय काय? आपण थेट संख्यांशीच दोस्ती केली तर... मग त्यांच्या नुसत्या निरीक्षणानंदेखील आपल्याला या संख्यांची गुपिते, त्यामागील गमती-जमती कळू लागतील.

जर तुम्हाला विचारलं की, ''संख्या तुम्हाला केव्हापासून ओळखीच्या झाल्या, आठवतेय का?'' बऱ्याच जणांचं उत्तर असेल, ''आम्ही शाळेत जायला लागलो तेव्हापासून.'' पण हे उत्तर काही तितकंसं बरोबर नाही. सहज गंमत म्हणून तुमच्या ओळखीच्या दीड-दोन वर्षे वयाच्या मुलाला विचारून बघा, ''तुला किती गोळ्या देऊ?'' हमखास उत्तर मिळेल, ''एकच नको, त्याच्याहून खूप जास्त.'' म्हणजेच इत या लहानपणापासून आपल्याला माहीत असलेल्या संख्या आपण जवळजवळ आयुष्यभर वापरत राहणार आहोत. मग त्यांना आपल्या सख्या म्हणजे मैत्रिणी मानल्या तर काहींची गणिताची भीती कमी होऊन त्यामध्ये रुची वाटू लागेल. हो नं? त्यासाठी गणितातील काही गमती-जमती बघूया.

१. i) **तुम्ही एका कागदावर कोणतीही तीन अंकी संख्या लिहा. उदा. 589**

ii) आता तीच संख्या तिच्याच पुढे परत एकदा लिहा. 589589

iii) या सहा अंकी संख्येला **7** ने भाग द्या व भागाकार लिहा : $589589 \div 7 = 84277$

iv) मिळालेल्या भागाकाराला **11** ने भाग द्या व भागाकार लिहा : $84277 \div 11 = 7657$

v) मिळालेल्या भागाकाराला **13** ने भाग द्या व भागाकार लिहा : $7657 \div 13 = 589$

मिळाली ना तुम्ही कागदावर लिहिलेली पहिलीच संख्या परत!

याचे कारण काय, हेही तुम्हाला कळलं पाहिजे कारण गणित म्हणजे असंच 'का?' चे कारण शोधणं होय.

$$589589 = 589000 + 589 = 589\,(1000 + 1) = 589 \times 1001$$

आता या 1001 चे अवयव पाडून बघू. $1001 = 7 \times 11 \times 13$ म्हणजेच आपण i, ii, iii, iv या पायऱ्यांमध्ये काय केले?

$$\begin{aligned} 589589 &= 589 \times 1001 \\ &= \frac{589 \times 1001}{7 \times 11 \times 13} \\ &= \frac{589 \times 1001}{1001} \\ &= 589 \end{aligned}$$

२. i) **दोन भिन्न अंक असलेली दोन अंकी संख्या लिहा. उदा. 67**

ii) तिच्या अंकांची अदलाबदल करून मिळणारी संख्या लिहा : 76

iii) आता या दोन्ही संख्यांची बेरीज लिहा. 67 + 76 = 143

अशाच पद्धतीने आणखी तीन-चार संख्या घेऊन त्यांच्या बेरजा करा.

अ) $\begin{array}{r} 35 \\ +53 \\ \hline 88 \end{array}$ ब) $\begin{array}{r} 97 \\ +79 \\ \hline 176 \end{array}$ क) $\begin{array}{r} 24 \\ +42 \\ \hline 66 \end{array}$ ड) $\begin{array}{r} 54 \\ +45 \\ \hline 99 \end{array}$

वरील पाच बेरजांचा विचार केल्यास आपल्याला काय साम्य आढळते? करा विचार.

बरोबर. या सर्वांना **11** ने भाग जातो. इथेच थांबू नका. **11** ने प्रत्येक बेरजेला भाग देऊन भागाकाराच्या उत्तरांचे निरीक्षण करा. काय आढळतं? होय, हे भागाकाराचे उत्तर = त्या संख्येतील अंकांची बेरीजच आहे.

बघा, 67 मधील अंक आहेत- 6 व 7. यांची बेरीज = **13** आणि 143 ÷ 11 = **13**

35 मधील अंक आहेत 3 व 5 त्यांची बेरीज = **8** व 88 ÷ 11 = **8**

यामागचे कारण काय असा प्रश्न पडलाय का? अगदीच सोपे कारण आहे. कोणतीही दोन अंकी संख्या म्हणजे दशक स्थानचा अंक + एकक स्थानचा अंक मिळून तयार होते.

आता दशक स्थानचा अंक = x व एकक स्थानचा अंक = y मानू. मूळची संख्या = $10x + y$

अंकांची अदलाबदल करून देणारी संख्या = $10y + x$. आता त्यांची बेरीज करू.

$10x + y + 10y + x = 11x + 11y = 11(x + y) = 11 \times$ अंकांची बेरीज.

आता तुम्ही एक सोपे काम करा. वरीलप्रमाणेच दोन्ही भिन्न अंक असलेल्या काही दोन अंकी संख्या घ्या. अंकांची अदलाबदल करून मिळणारी संख्या लिहा. त्यापैकी मोठ्या संख्येतून लहान संख्या **वजा** करा. या सर्व वजाबा यांच्या उत्तरांचे निरीक्षण करा. सर्वांना मोठ्यात मोठ्या कोणत्या संख्येने भाग जातो ते ठरवा व भाग देऊन मिळणाऱ्या उत्तरांचा व मूळच्या संख्येतील अंकांचा काही संबंध सापडतो का ते बघा.

३. 1089 या संख्येची गंमत

एक तीन अंकी संख्या लिहा. पण अंक उलट्या क्रमाने लिहिल्यास संख्या तीच राहणारी, उदा. 272 सारखी नको. (272 सारख्या संख्यांना इंग्रजीमध्ये palindromic संख्या म्हणतात.) समजा, माझी संख्या आहे : 294

i) यातील अंक उलट्या क्रमाने लिहा : 492

ii) यापैकी मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा.

492 - 294 = 198

iii) यातील अंक परत उलट्या क्रमाने लिहा : 891

iv) आता या दोन संख्यांची बेरीज करा.

198 + 891 = 1089

कितीही भिन्न संख्या घेऊन त्याच क्रमाने बिनचूक पायऱ्या केल्यास नेहमी 1089 हीच संख्या मिळते. शोधा बरं यामागची कारणं काय असू शकतील?

४. काही खास संख्या व त्यांचे घन

अ) 3, 4, 5, 6 या क्रमवार नैसर्गिक संख्या आहेत. त्यांच्या घनांच्या किंमतीचा एक अनोखाच संबंध आहे.

$3^3 = 27, 4^3 = 64, 5^3 = 125, 6^3 = 216$

जाणून घ्या : भारतातील पहिली विज्ञान वाचस्पती - **असिमा चॅटर्जी** (इ. स. १९४४)

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

यांपैकी पहिल्या तीन घनसंख्यांची बेरीज करू.

$3^3 + 4^3 + 5^3$ (27 + 64 + 125) = 216

म्हणजेच $\mathbf{3^3 + 4^3 + 5^3 = 6^3}$

क्रमानं येणाऱ्या चार संख्यांमधील हा गुणधर्म तसा दुर्मिळच म्हणावा लागेल.

ब) 1, 8, 17, 18, 26, 27... या नैसर्गिक संख्यांचे घनही वैशिष्ट्यपूर्ण कसे आहेत ते बघूया.

$8^3 = 512$ आता 512 या संख्येतील अंक 5, 1, 2 यांची बेरीज करू. 5 + 1 + 2 = **8**

$17^3 = 4913$ व 4 + 9 + 1 + 3 = **17**

$18^3 = 5832$ व 5 + 8 + 3 + 2 = **18** इ.

येथे घनसंख्येतील अंकांची बेरीज ही ज्या संख्येचा तो घन आहे. ती मूळ संख्या आहे.

क) याउलट काही नैसर्गिक संख्या अशा आहेत की, त्यांच्या अंकाच्या घनांची बेरीज म्हणजेच ती नैसर्गिक संख्या होय. उदा. 153, 370, 371, 407...

153 या संख्येतील अंक आहेत 1, 5 व 3. आता त्यांच्या घनांची बेरीज करू

$1^3 + 5^3 + 3^3 = 1 + 125 + 27 = 153$

तसेच 370 बाबत आढळेल. $3^3 + 7^3 + 0^3 = 27 + 343 + 0 = 370$

आहेत ना वैशिष्ट्यपूर्ण संख्या?

ड) 157 ही संख्या तर फारच मजेशीर आहे कारण ती पाच घन संख्यांच्या बेरजेच्या स्वरूपात दोन भिन्न प्रकारे व्य त करता येते.

१) $157 = 4^3 + 4^3 + 3^3 + 1^3 + 1^3$ २) $157 = 5^3 + 2^3 + 2^3 + 2^3 + 2^3$

इ) हार्डी – रामानुजन संख्या : 1729

1729 ही सर्वात लहान अशी संख्या आहे की ती दोन संख्यांच्या घनांच्या बेरजेने दोन भिन्न प्रकारे लिहिता येते.

$1729 = 9^3 + 10^3$ व $1729 = 12^3 + 1^3$

हे वैशिष्ट्य रामानुजन यांनी आपले गुरू हार्डी यांना सांगितलं. तोपर्यंत प्रा. हार्डींना हे माहीत नव्हतं.

अशा असतात या संख्या आपल्या सख्या. त्या विचारश तीला भरपूर खाद्य पुरवितात. आपला वेळ सार्थकी लावतात. शिवाय कागद व पेन यांखेरीज कोणत्याही महागड्या अपेक्षाही ठेवत नाहीत. अशाच काही वैशिष्ट्यपूर्ण संख्याविषयी नंतर कधीतरी बोलू.

– रोहिणी डाके,
११४६, 'अश्ववेध' अपार्टमेंटस्, सदाशिव पेठ, पुणे 410030

जरा डोकं चालवा



या चित्रात एकूण १७ काड्यांनी बनलेले सहा चौरस दिले आहेत. यातील केवळ ६ काड्या अशा तऱ्हेनं हलवा, की फ त दोनच चौरस राहायला हवेत.

सांजवेळ



सांज वेळ झाली, दिवे लागणीची
रानी-वनी शांत, गाणी पाखरांची ।।१।।

हळूहळू तारे, नभ लागे बोलू
अंधारली रात्र, स्वर्ग लागे फुलू ।।२।।

चंद्र आला वर, शुभ्र शुक्र तारा
पहा स्थिर उभा, दिसे ध्रुव तारा ।।३।।

आनंदी सोहळा, माझ्या डोईवर
अंगणात माझ्या, फुलला अंधार ।।४।।

भाकरी एवढा, चंद्र डोईवर
पुनवेची रात्र, सुरेख सुंदर ।।५।।

रात्र लागे चढू, स्वर्ग लागे फुलू
एक-एक दिवा, विझू लागे हळू ।।६।।

देवा काय-काय, पाहू आभाळात
मन माझे आता, डोले आनंदात ।।७।।

– सूर्यकांत मालुसरे
१०१, श्रीदर्शन, के. जी. मार्ग, दादर, प्रभादेवी, मुंबई – २५

बुद्धीला खुराक...

सूडोकू

३					
			३		
				२	
	४				
			१		
६					१

सोडवण्याचा नियम –

- शेजारील चौकटीत १ ते ६ अंक उभ्या व आडव्या ओळीत एकदाच आला पाहिजे.
- तसेच गडद केलेल्या आयतामध्ये १ ते ६ अंक एकदा येणे आवश्यक आहे.
- एकापेक्षा जास्त उत्तरे शोधा

सूडोकू बनवण्यासाठी नियम – ६ × ६ चा चौकोन तयार करा.
त्यातील ३×२ चे चौकोन गडद करावे (त्यात उभे तीन व आडवे दोन चौकोन गडद करून घ्या). १ ते ६ अंक घेऊन तुम्ही हे कोडे बनवू शकाल. प्रत्येक उभ्या व आडव्या रांगेत कोठेही अंक घेऊन कोडं सोडवायला सुरू करा. आवश्यक असल्यास सुरुवातीच्या एखाद्या अंकाची अदलाबदल करा.
१ ते ९ अंकांचा वापर करून देखील तुम्ही सुडोकू तयार करू शकाल. त्यासाठी ९× ९ चा चौकोन तयार करा.

– अमेय आमशेकर
ameyamshekar@gmail.com

ध्येयसूर्य ना कधीही मावळो । की अफाट नभ वरून कोसळो ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय महिला आय. ए. एस. अधिकारी – **अन्ना जॉर्ज** (इ. स. १९५०)

प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

दुर्ग साहित्य संमेलन एक आनंद सोहळा

– आनंद पाळंदे

इतिहास, भूगोल, पर्यटन, संस्कृती, कला आणि संरक्षण अशा कितीतरी धाग्यांनी किल्ल्यांचे बंध आपल्याभोवती विणले जातात. कुणाला दुर्गांचा इतिहास खुणावतो तर कोणी त्या - त्या काळातल्या संस्कृतीच्या पाऊलखुणा किल्ल्यांवर शोधतो. अशाच सर्व दुर्गप्रेमींसाठी 'गोनीदां दुर्गप्रेमी मंडळा'च्या वतीने दुर्गसाहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. सर्व दुर्गप्रेमींसाठी तो आनंद सोहळाच असतो !

महाराष्ट्र हा दुर्गांचा देश. जवळ जवळ आठशे वर्षांपासून गिरिदुर्गांनी, जलदुर्गांनी, भुईकोटांनी या देशातील जनतेचे संरक्षण करण्यात आपला वाटा सिद्ध केला आहे. त्याहीपूर्वी सातवाहन काळात दुर्ग अस्तित्वात होते का, हे सांगता येत नाही; पण शिलाहार राजांनी १५ दुर्ग बांधल्याचा ताम्रपटातील उल्लेख या संदर्भात १२ व्या शतकापर्यंत दुर्ग इतिहास मागे घेऊन जातो. हा उल्लेख म्हणजे एक प्रकारचे दुर्ग साहित्यच होय. यापूर्वीही आर्य चाण यांनी नगररचना करताना दुर्ग बांधणीचा उल्लेख ग्रंथामधे केलेला आहे.

दुर्गविषयक साहित्याची उपयोगिता लक्षात घेऊन 'गोनीदां दुर्गप्रेमी मंडळ' स्थापन करण्यात आले. याच बरोबर हे दुर्ग संमेलन शहरात न घेता एखाद्या गडावर अथवा गडाजवळ घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे २०१० साली पहिले संमेलन दुर्ग राजमाची येथे लोणावळ्यापासून १२ किमी अंतरावर भरवण्यात आले. सरळ वाट सोडून, वळणाच्या चढ-उतारांच्या वाटांवरून चारशे डोंगरयात्रींनी राजमाची गड गाठला. थेट गडाजवळ समंलेन योजल्यामुळे स्थानिक जनता लाभार्थी होईल. योग्य वातावरण निर्मिती होऊन 'दुर्ग' हा विषय अधिक खोलवर जाऊन दुर्गप्रेमींना अभ्यासता येईल आणि आस्वादही घेता येईल, असाही दुर्ग साहित्य संमेलन वेगळे भरविण्यामागचा उद्देश होता.

संमेलनस्थळी दुर्गस्थाने नोंदविलेला मोठा नकाशा, गड फोटोंचे प्रदर्शन भरवण्यात आले. काही



विजयदुर्ग

संमेलनांमध्ये युवकांसाठी निबंध स्पर्धाही भरवण्यात आली होती.

अनेक वर्ष इतिहासप्रेमाने दुर्गयात्रा करणारे यात्री महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात दुर्गयात्रा मोठ्या प्रमाणात काढण्याचे श्रेय शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि गो. नी. दांडेकर या इतिहासप्रेमी द्वयींकडे जाते. या दोघांनी गडकोटांना नुसत्याच भेटी दिल्या नाहीत तर त्यावर लेखन करून तरुणांना देशप्रेमासाठी प्रेरणा दिली. अलिकडे या यात्रांमध्ये पर्यावरण, गिर्यारोहण, व्यायाम, फोटो-चित्रकला, सामाजिक उपक्रम अशाही पैलूंची भर पडते आहे. मुंबई, मुलुंड येथे गेली दहा वर्षे 'महाराष्ट्र सेवा संघ' गिरिमित्र संमेलन योजत आहे. अतिशय नेटके संयोजन असलेले हे लोकप्रिय संमेलन दुर्गविषयक सर्व उपक्रमांना संधी देते.

संमेलनांमध्ये विविध चर्चा, परिसंवाद. व्याख्याने यांनी रंगत वाढते. दुर्ग साहित्याचा उल्लेख केलेल्या दुर्गांच्याविषयी अभिवाचनाचे प्रयोग त्या त्या दुर्गांवर होतात. उदा. २०१२ साली रायगड जिल्ह्यातील कर्नाळ्याच्या पायथ्यास दुर्ग संमेलन झाले. तेव्हा पौर्णिमेच्या चांदण्यात कर्नाळा न्हाऊन निघत असताना 'जैत रे जैत' चे अभिवाचन झाले यामुळे संमेलन चिंब आनंदी झाले. 'गोनीदां'नी 'जैत रे जैत' कांदबरी कर्नाळ्याच्या पार्श्वभूमीवर लिहून कर्नाळा दुर्गरसिकांच्या मनात अधिक खोलवर रुजवला आहेच. यामुळे ही पर्वणीच होती. दुर्ग निसर्गप्रेमी डॉ. संदीप क्षोत्री, ओंकार ओक यांनी दुर्ग रसिकांची कर्नाळा परिसर फेरी घडवून आणली. अर्थातच हे संमेलन इतके आवडले, की पुढील वर्षीच्या विजयदुर्ग संमेलनाची घोषणा तिथेच करण्यात आली.

यावर्षी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ले विजयदुर्ग प्रेरणोत्सव समितीने विजयदुर्ग संमेलनाचे खडतर आव्हान लीलया पेलले. कारण गाव विजयदुर्ग अगदी लहान. ५०० जणांची निवासव्यवस्था कशी करणार? पण आसपासच्या १०-१२ किमी. परिसरातील व्यावसायिक अनुभव नसलेल्या घरातील 'पाहुणेघरात' सर्वांची निवास-न्याहरी योजना केली गेली. कोकणातील आंब्याच्या वाडीतील निवासामुळे या तिसऱ्या दुर्ग संमेलनाची खुमारी अधिकच वाढली. शिवाय गडावरून मंडपातून दिसणारा अथांग सिंधुसागर आणि ...खाडी यामुळे दुधात साखरच पडली. विजयदुर्ग हा मराठ्यांचा आरमारातील ८०० वर्षांपूर्वी उभारलेला बुलंद बांधणीचा दुर्ग आहे. ...कान्होजी, संभाजी आंग्रे, आनंदराव धुळुप यांसारखे बलदंड आरमारी सेनानी असल्यामुळे विजयदुर्गने इंग्रज डच, पोर्तुगिजांना ट कर दिली आहे. अशा प्रेरक स्थळी भारतीय नौसेना युद्धनौकाही सलामी देण्यासाठी विद्युत रोषणाईसह हजर होती. 'हे तो श्रींची इच्छा' कादंबरीचे अभिवाचन आणि स्थानिक कलाकारांचे गोफनृत्य, समई नृत्य यामुळे संमेलन कायम स्मरणात राहील असेच झाले. अनेक दुर्गप्रेमी गिर्यारोहक, इतिहास संशोधक, शिवचरित्र कथनकार, अनेक दुर्ग पर्यटक आणि स्थानिक जनता तीन दिवस गडावर आले होते.

अप्रकाशित दुर्गांचा शोध, दुर्ग साहित्याचा प्रवास, दुर्ग पर्यटन, अशा कितीतरी विषयांवर परिसंवाद झाल्यामुळे अनेक युवक-युवतींना त्या विषयांची सखोल माहिती मिळण्यास मदत झाली. गडाच्या संवर्धनाचे स्वेच्छेने काम करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली. पडणाऱ्या, ढासळणाऱ्या उपेक्षित अशा दुर्ग स्मारकांबद्दल निरनिराळ्या ठिकाणी अनेक युवक-युवती शासनाकडून कोणतीही पैशाची अपेक्षा न ठेवता स्व-खर्चाने संवर्धनाचे काम करीतच आहेत. अशी ही दुर्ग संस्कृती टिकवण्याचे, जगवण्याचे आणि पुढच्या पिढीकडे संक्रमित करण्याचे काम या दुर्ग साहित्य संमेलनातून घडत असते. विद्यार्थी, युवकांनी पुढील वर्षीच्या स ानगड संमेलनात मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे आणि प्रेरणा घ्यावी ती श्री समर्थ रामदासांच्या 'शिव स्वराज्याची.'

- आनंद पाळंदे
२/३ एरंडवन, कर्वे रस्ता, पुणे 411004

छात्र प्रबोधनच्या अंकातील शेजारील चौकट ज्या लेखांच्या सुरुवातीला दिली आहे त्या लेखांशी निगडित ऑडिओ/व्हिडीओ इंटरनेटद्वारा आपल्या संगणकावर कसे ऐकावे/पाहावे याच्या सूचना खाली दिल्या आहेत. त्याप्रमाणे कृती करुन लेखांच्या वाचनाबरोबरच पूरक साहित्याचा आनंद घ्या.

Tag No. ActiveLink | ऑडिओ/व्हिडीओ पाहा/ऐका

View multimedia content on your Computer or on the Mobile/Tablet

Instructions to use ActiveLink on PC and Mobile/Tablet:

1. Go to http://www.activel.in

2. You can use your PC as well as your tablet/mobile (Smartphone).

3. Insert the 'tag number given with the article in Chhatra Prabodhan and **click 'search** for video.

टॅग नंबरसाठी पाहा - पान क्र. १, १०, १३, २३, २६

आम्ही कॉपी करणार नाही...
...आम्ही कॉपी करू देणार नाही !!

Tag No. **CP130662** ActiveLink | **संदेश ऐका**

आलस्य अवघाचि दवडावा, येत्न उदंडचि करावा । शब्दमत्सर न करावा, कोणी येकाचा ।।

जाणून घ्या : मिस युनिव्हर्सचा किताब मिळवणारी पहिली भारतीय महिला - **सुष्मिता सेन**

प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

लाउड कम्प्युटिंग (Cloud computing)

- आराधना देशमुख, डॉ. कांचनगंगा गंधे

मित्रांनो, मागील अंकात (सौर पौष/फेब्रुवारी २०१३) तुम्ही ' लाउड कम्प्युटिंग' ही संकल्पना समजूत घेतलीत. मागणीनुसार पुरवठा करणारी ही एक 'ऑनलाईन' सुविधा असते. सोबतच्या लेखातून लाउड कम्प्युटिंगचे प्रकार-उप्रकार तसेच लाउडद्वारा मिळणाऱ्या सुविधांविषयी आपण जाणून घेऊया.

लाउड कम्प्युटिंगचे जरी अनेक उपप्रकार असले, तरी त्याचे मुख्य तीन प्रकार आहेत.

१. सार्वजनिक - (Public Cloud)

२. खाजगी - (Private Cloud)

३. संकरित - (Hybrid Cloud)

१. सार्वजनिक लाउड कम्प्युटिंग (Public Cloud) हे लाउडचे दर्जेदार मॉडेल आहे. त्यातून मिळणारी माहिती सर्व लोकांना 'इंटरनेट' मार्फत सहजी मिळते, ती अमर्याद स्वरूपाची असली तरी पूर्णपणे सुरक्षित नसते. हे कम्प्युटिंग वापरण्यासाठी फ त 'इंटरनेट' ची सुविधा तुमच्या संगणकाला असावी लागते. यातून मिळणारी बरीचशी माहिती (Resources) फुकट असते. त्यासाठी वेगळे शुल्क द्यावे लागत नाही, पण अगदी वचित काही माहितीसाठी पैसे भरावे लागतात. हे लाउड वापरण्यासाठी अतिशय सोपे आणि कमी खर्चाचे आहेत. जेवढे इंटरनेटचे 'रिर्सोसेस' वापरतो, तेवढ्याचेच पैसे भरावे लागतात. उदा.- गुगल ॲप इंजिन, ॲमेझॉन इलॅस्टीक कॉम्प्युट लाउड, सन लाउड, आय्. बी. एम्. चे 'ब्लू लाऊड', विंडोज अझुरे सर्व्हीसेस प्लॅटफॉर्म इत्यादी.

२. खाजगी लाउड (Private Cloud) यालाच 'इंटरनल' किंवा 'कॉर्पोरेट लाउड' असंही म्हणतात. एखादया संस्थेमध्ये, कारखान्यामध्ये, कार्पोरेट ऑफीसमध्ये किंवा अशा प्रकारच्या संघटनांमध्ये माहिती किंवा 'डेटा' खाजगी स्वरूपातच ठेवायचा असेल, तर 'खाजगी लाउड'चा वापर करतात. हा लाउड ती संस्था/कंपनी स्वत: तयार करून सुरक्षितही ठेवून शकते. किंवा एखाद्या 'सर्व्हीस' देणाऱ्या कंपनीकडून फ त त्यांच्यासाठीच्या उपयोगासाठी विकतही घेऊ शकते.



३. संकरित लाउड कम्प्युटिंग (Hybrid Cloud) या प्रकारच्या प्रारूपामध्ये कमीतकमी एक सार्वजनिक आणि एक खाजगी लाउड यांचे संमिश्र स्वरूप असते. हे दोन प्रकारांनी उपलब्ध करून देता येते. काही कंपन्यांकडे त्यांचे स्वत:चे 'खाजगी लाउड', (प्रायव्हेट लाउड) असतात. ते 'सार्वजनिक लाउड'- (पब्लिक लाउड) कंपन्या 'प्रायव्हेट लाउड' कंपन्यांना 'प्लॅटफॉर्म' वापरून 'सर्व्हीस' देतात. या संकरित लाउड प्रारूपात (मॉडेल) एखादी कंपनी त्यांना हवी असलेली प्राथमिक माहिती 'पब्लिक लाउड' मधून घेते. नंतर त्यावर योग्य प्रक्रिया करून ती त्यांच्या लायंटच्या कामासाठी उपयोगात आणते. लायंटच्या कंपनीपुरतीच ती माहिती मर्यादित राहते तेव्हा 'प्रायव्हेट लाउड' चा वापर होतो. या प्रक्रियेमुळे पैसा वाचतो, कारण 'पब्लिक लाउड' मधल्या बऱ्याचशा 'ऑपरेशन्स'ना पैसे द्यावे लागत नाहीत.

या लाउड्समधून अनेक सुविधाही आपल्याला उपलब्ध होतात.

१. सोशल नेटवर्किंग - ई-मेल, फेसबुक, यु-ट्युब, टीटर यांसारख्या नेटवर्कींगमुळे अनेक जण प्रत्यक्षात भेटत नसले, तरी एकमेकांशी जोडले जातात. त्यातून आचार-विचारांचे आदान-प्रदान होऊ शकतं, आपल्याला हवी असलेली माहिती इतरांना आपण विचारू शकतो किंवा इतरांना देऊही शकतो. थोर व्य तींचे विचार वाचू शकतो, त्यांच्याशी संपर्कही करू शकतो, म्हणजेच आपल्या संपर्काची व्यापकता वाढते.

२. सॉफ्टवेअर सर्व्हीस - 'गुगल डॉ स' सारखे 'सर्व्हीस प्रोव्हायडर्स' असल्यामुळे सर्व सॉफ्टवेअर आपल्याला

- इंटरनेट कने शन असेल तर तुमच्या स्वत:च्या कम्प्युटरवर, लॅपटॉप, मोबाईलवरसुद्धा 'पब्लिक लाउड' तुम्ही उघडू शकता.
- 'पब्लिक लाउड' मार्फत तुम्ही जी. पी. एस.द्वारा इच्छित स्थळी जाण्यासाठीचा नकाशा तुम्ही काढू शकता.
- गुगल अर्थ/गुगल मॅप वरून तुमच्या इच्छीत स्थळाचा नकाशा तुमच्या मोबाईलवर/लॅपटॉपवर 'लोड' करू शकता.
- इंटरनेटद्वारा 'ई-मेल' वापरून तुमच्या मित्रांना अभ्यासाविषयीच्या शंका विचारू शकता. पुढील काही काळात शाळेतल्या शिक्षकांशी 'ई-मेल' मार्फतच संपर्क करावा लागणार आहे. यातून प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैय तिक लक्ष पुरवणे सहज श य होईल.

विकत घ्यावी लागत नाहीत; काही मर्यादेपुरती/काही काळापुरती आपण ती विकत घेऊ शकतो.
(जी सॉफ्टवेअर्स विकत घ्यावी लागतात, अशा सॉफ्टवेअरवर त्याचे मूल्य नोंदवलेले असते.)

३. प्लॅटफॉर्म सर्व्हीस – 'इंटरनेट' साठी लागणाऱ्या सर्व दृश्य स्वरूपातील सेवा आपल्याला विकत घेण्याची जरूरी नसते. काही सुविधा 'मायक्रोसॉफ्ट इंटरनेटने' उपलब्ध करून दिल्या आहेत.

४. स्टोअरेज सर्व्हीस – आपल्याकडची माहिती 'स्टोअर' करण्यासाठी/साठवून ठेवण्यासाठी 'इंटरनेट' सर्व्हीस पुरवणाऱ्यांनी जास्त 'स्पेस' इंटरनेटमध्ये उपलब्ध करून दिली आहे. उदाहरणार्थ – पूर्वी 'जी-मेल' वर 2 GB एवढीच जागा उपलब्ध होती, पण आता ती वाढवून 20 GB इतकी केली आहे.

५. सुरक्षितता – आपली माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व्हीस पुरवणाऱ्या कंपन्यांनी 'पासवर्ड'ची सोय करून सुरक्षितता अबाधित ठेवली आहे.

एकूणच लाउड कम्प्युटिंगमुळे सर्व जग जवळ आलं आहे. त्याची व्यापकताही वाढली आहे. अनेक सोयी, सुविधाही निर्माण झाल्या आहेत. सुविधांचं हे मायाजाल गुंतागुंतीचं आणि रोज वाढत जाणारं आहे. या मायाजालाचा विधायक उपयोग आपण कसा करायचा आणि या क्षेत्रात कसं पुढं जायचं हे प्रत्येकानं ठरवलं तरच संगणकाच्या युगात आपण अग्रगण्य ठरू.

आराधना देशमुख
६, मेघना सोसायटी, तुळशीबागवाले कॉलनी
सहकारनगर, पुणे 411009
डॉ. कांचनगंगा गंधे kanchan.gandhe@gmail.com

ज्ञान प्रबोधिनी विस्तार केंद्र डोंबिवली व बोरिवलीतर्फे आयोजित

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कलचाचणी व समुपदेशन

इ. १० वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणाचे योग्य क्षेत्र निवडण्यासाठी तज्ज्ञ व्य तींकडून चाचणी व नंतर त्यासंबंधी मार्गदर्शन केले जाईल.

डोंबिवली	बोरिवली
परीक्षा : रविवार, दि. ३१ मार्च २०१३	**परीक्षा :** रविवार, दि.७ एप्रिल २०१३
वेळ : सकाळी १०.०० ते १.०० (माफक शुल्क)	**वेळ :** सकाळी ११.०० ते २.०० (माफक शुल्क)
स्थळ : सिस्टर निवेदिता शाळा, MIDC, डोंबिवली	**स्थळ :** बीमानगर एज्यू. सोसा. शांती आश्रम, जीवन बीमानगर, बोरीवली (प), मुंबई
संपर्क : वृंदा गोडसे – ९६१९३२४८१० शुभा कुलकर्णी – ९००४६७२३८५	**संपर्क : सुमिता पांढरे – ९९६९०५१५७३ स्मिता साठे – ०२२ –२८७०६७६९**

उत्तम गुण तितुके घ्यावे, घेऊन जनास शिकवावे । उदंड समुदाये करावे, परी गुप्तरूपे ।।

जाणून घ्या : ऑलिंपिकमध्ये अंतिम टप्प्यात पोहोचलेली पहिली भारतीय धावपटू **– पी. टी. उषा**

प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

घरच्याघरी सायकल दुरुस्ती !

ऋषिकेश पाळंदे

Tag No. CP130633 ActiveLink | दुरुस्तीचा व्हिडीओ पाहा
तपशीलासाठी पृ. क्र. १० पाहा.

आपल्या घरी असलेली कोणतीही वस्तू वा यंत्र आपल्या जवळचे, विशेष आवडीचे कधी होते? जेव्हा ती वस्तू वा ते यंत्र आपल्या सतत परिचयाचे होईल तेव्हा! असं केव्हा होईल? जेव्हा वस्तूची किंवा यंत्राची आस्थापूर्वक देखभाल आपण करू तेव्हाच! तुम्हा मुलामुलींसाठी सायकल हे दैनंदिन व्यापासाठी तुमचा वेळ वाचवणारं अत्यंत उपयोगी साधन. सवयीनं, न विसरता तिची आपुलकीनं विचारपूस केल्यास ती न कुरकुरता उत्तम साथ देते. मात्र, त्यासाठी काही वेळ तिच्या सोबत घालवावा लागतो व स्वत:चे हात, कपडे काळे करून घ्यायची इच्छा असायला लागते.

काही छोटे-छोटे बिघाड झाल्यास प्रत्येक वेळी सायकल दुरुस्तीच्या दुकानाकडे पळण्यापेक्षा, स्वत: खपून तिचं 'हवे-नको' बघण्यात एक वेगळीच गंमत दडली आहे. यासाठी निरीक्षण श तीची जोड हवी. सर्वप्रथम आपली सायकल पुढ्यात ठेवून ती काही वेळ न्याहाळायची सवय लावायला हवी. तिचे भाग कुठले आहेत? ते कसे बसवलेत? त्यांचं नेमकं काम काय? याची नोंद मनात किंवा सरळ वहीत करून ठेवावी. सायकलमध्ये काही बिघाड झाल्यास तो दूर करण्यासाठी या निरीक्षणांचा न की उपयोग होतो.

सायकल व तिचे भाग



१. फ्रेम	११. पुढील व मागील हब
२. पुढील चिमटा किंवा फोर्क	१२. स्पो स
	१३. व्हॉल्व्ह
३. हँडल (बार्स)	१४. टायर्स
४. सीटच्या खालील स्प्रिंग	१५. रिम
५. बैठक (सीट)	१६. चेनव्हील
६. ब्रेक लिव्हर्स	१७. मागील चिमटा किंवा फोर्क
७. ब्रेक रॉड्स	
८. ब्रे स	१८. चेन
९. मडगार्ड	१९. क्रँक
१०. रे रिफ्ले टर्स	२०. पॅडल

सायकलची निगा राखण्यासाठी आपल्याजवळ काही दुरुस्ती हत्यारे हवीत. ती खालीलप्रमाणे

१) तीन प्रकारचे पाने -

अ) १३ छिद्रांचा पाना - सर्व नट काढण्यासाठी व घट्ट करण्यासाठी **ब)** १४-१५ छिद्रांचा पाना-पुढचा व मागचा अॅ सेल घट्ट करण्यासाठी **क)** १०-११ छिद्रांचा पाना-ब्रेकचे नट घट्ट व सैल करण्यासाठी

२) प कड - लहानात लहान नट सैल वा घट्ट करण्यासाठी तसेच ज्या वस्तू हाताने निघत नाहीत त्या ओढून काढण्यासाठी. **३) हातोडी**

४) सायकलचा हवा पंप ५) स्क्रू ड्रायव्हर

या हत्यारांच्या साहाय्याने आपण सायकल उत्तम स्थितीत ठेवू शकतो. यासाठी तुमच्या 'भरगच्च' वेळापत्रकातून वेळ काढून तुम्ही खालील गोष्टी आवर्जून कराव्यात.

१) रोज किंवा २-३ दिवसांनी सायकल फड यानं पुसून काढावी.

२) आठवड्याने किंवा पंधरवड्याने एकदा तरी सायकलचे ऑयलिंग करावे. म्हणजेच सायकलच्या घर्षण होणाऱ्या फिरत्या भागात तेल घालावे. नाहीतर सायकल चालवण्यास जड होऊन तिची गती मंदावते, आवाज येऊ लागतो, सायकलच्या भागांची झीज होऊन ते निकामी होतात.

ऑयलिंग करावे असे भाग पुढीलप्रमाणे - १) चेन २) ब्रेक व मडगार्डवरील ब्रेक लिव्हर ३) स्टँड

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

४) अॅ सेल्स ५) पॅडल्सचा फिरता भाग व दोन पॅडल्स जोडणारा अॅ सेल ६) कुलूप

३) ऑयलिंग झाल्यावर सर्व नट बोल्टस् व स्क्रू घट्ट करावेत. मग एका कापडाने सायकलचे सर्व भाग स्वच्छ पुसून काढावे. स्क्रू ड्रायव्हर घेऊन मडगार्डला आतल्या बाजूनं चिकटलेली वाळू काढावी.

४) कित्येकदा व्हॉल्व्ह खराब झाल्यानं चाकातील हवा जाते. अशावेळी सायकल पं चर झाली आहे असा आपला समज होतो. हे टाळण्यासाठी, दर पंधरवड्यानं व्हॉल्व्हची रबरी पुंगळी बदलावी. त्यासाठी टायर-ट्यूबवरील व्हॉल्व्ह होल्डरचा रिंग नट ढिला करून व्हॉल्व्ह बाहेर काढावा. व्हॉल्व्ह ट्यूबवरची रबरी पुंगळी जोराने ओढून काढून टाकावी. तेवढ्याच लांबीची दुसरी पुंगळी घेऊन ती त्या जागी बसवावी. ती चटकन बसण्यासाठी पाण्यानं तिला ओलं करावं.

५) बऱ्याच वेळेस खराब रस्त्यावरून किंवा खड्ड्यांमधून जाण्याने मडगार्डचे स्क्रू-नटस् निखळतात. ते नीट बसवण्यासाठी –

i) मागचे चाक – मागच्या चाकाच्या मडगार्डचा स्क्रू सायकलच्या मुख्य सांगाड्याशी जिथे बसवला असतो, ती जागा साधारण पॅडल्सच्या अॅ सलच्या मागे असते. तो स्क्रू बदलण्यासाठी प्रथम चाकातील हवा काढून घ्यावी. त्यानंतर जुना स्क्रू काढून टाकावा. नवीन स्क्रू एका बाजूनं घालून दुसरी कडून चकती व नट बसवावा. एका बाजूचं टोक पकडीनं धरुन, दुसऱ्या बाजूनं योग्य पान्यानं नट आवळावा.

ii) पुढचे चाक – पुढच्या चाकाचे मडगार्ड सायकलच्या मुख्य सांगाड्याशी ब्रे सच्या फिटींग सहित बसवलेलं असते. तिथला नट घट्ट करण्यासाठी पकडीच्या साहाय्यानं पुढील बाजूचा स्क्रू धरून दुसऱ्या हातानं पाना धरून नट आवळावा.

अशी घरच्या घरी नियमित देखभाल केल्यास सायकल प्रदीर्घ काळ व्यवस्थित राहू शकते. या नियमित सरावानं आपल्याला सायकलचं मर्म अधिकाधिक कळायला लागतं आणि हळूहळू 'निगा राखणं' हे काम न राहता ते सवयीचं होतं. अगदीच मोठा बिघाड झाल्यास किंवा साधारणत: चार-पाच महिन्यातून एकदा अॅ सेलच्या वाट्या, बॉलबेरींग्ज बदलायचे असतील तरच जवळच्या सायकल दुरुस्ती कारागिरास गाठावं.

स्वत: खपून सायकलची निगा राखली तर सायकलबरोबर आपलीही तब्येत उत्तम स्थितीत राहते. सायकल दुरुस्त केल्याचा एक परिणाम म्हणजे आपला आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. आपल्या इतर कामातसुद्धा हा आत्मविश्वास आपल्याला खूपच उपयोगी पडतो, यात तिळमात्र शंका नाही.

– ऋषिकेश पाळंदे
२/३ एरंडवणे, कर्वे मार्ग, पुणे – ४
hrishpalande@gmail.com

पूरक उपक्रम – *सायकल दुरुस्ती कारागिराकडून पंक्चर काढण्याविषयी माहिती गोळा करावी म्हणजे सायकलची निगा राखण्यात त्याचीही जोड मिळेल.*

प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बु स अॅ ट
अधिनियम ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती
अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)

वृत्तपत्राचे नाव	**: छात्र प्रबोधन**
प्रसिद्धी काळ	**: मासिक**
संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे नाव व पत्ता:	**प्रा. महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०**
राष्ट्रीयत्व	**: भारतीय**
मासिकाची मालकी :	**ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०**

मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

पुणे
सौर १० फाल्गुन शके १९३४ **(महेन्द्र सेठिया)**
(१ मार्च २०१३) **संपादक, छात्र प्रबोधन**

शरणागत

–अनु. नीलिमा करमरकर

फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे ! त्या काळी लोकं सनातनी, कर्मठ होते. बलुतेदारी पद्धत, जातीव्यवस्था यांचा समाजावर जबरदस्त पगडा होता. असे असले, तरीही नैतिक मूल्यांचा आग्रह धरणारेही काही लोक होते. त्याच समाजाचा एक भाग असलेल्या रज्जब कसाई आणि ठाकूर यांची ही गोष्ट... हिंदीतील प्रसिद्ध लेखक वृंदावनलाल वर्मा यांच्या कथेचा हा स्वैर अनुवाद...

रज्जब कसाई आपलं काम आटपून ललितपूरच्या दिशेनं माघारी चालला होता. बरोबर बायको होती. गाठोड्यात दोन–चारशे रुपयांची र कम होती. रस्ता जंगलातून जाणारा निर्मनुष्य होता; म्हणून त्यानं जवळच्या गावात रात्रीचा मु काम करण्याचं ठरवलं. बायकोला ताप भरला होता. त्याला जवळचे पैसेपण सांभाळायचे होते. भाड्याची बैलगाडी केली, तर कितीतरी पैसे मोजावे लागले असते.

पण गावात उतरणार तरी कुठे? जातपात तर लपवता येत नाही. शिवाय बरेच लोक त्याला ओळखणारे होते. अनेकांनी आपली गुरेढोरे त्याला विकली होती. ओळखीच्या लोकांकडे त्याने रात्रीपुरता आश्रय देण्याची विनंती केली; पण कोणी त्याला थारा दिला नाही.

त्याच गावात एक ठाकूर होते. आता त्यांची थोडीफार जमीन आणि छोटा पडका वाडा शिल्लक होता; पण पूर्वीचा रुबाब कायम होता. उत्पन्न फारसं नसल्यानं स्वत:ची 'शानशौकत' जपणं त्यांना कठीण झालं होतं. स्वत:ची खोटी शान, प्रतिष्ठा जपण्यासाठी वेळप्रसंगी वाईट मार्गाचा अवलंब धन मिळविण्यासाठी ते करत असत. ते स्वत:ला 'राजा' म्हणवून घेत. म्हणतात ना, सुंभ जळाला तरी पीळ कायम होता.

रज्जब आपल्या तापानं फणफणलेल्या बायकोला घेऊन ठाकूरांच्या दाराशी आला. ते ओसरीतल्या झोपाळ्यावर हु का पित बसले होते. रज्जब बाहेरूनच सलाम करून म्हणाला, ''महाराज, एक विनंती आहे.''

ठाकूरनं विचारलं, ''काय?''

रज्जब म्हणाला, ''मी लांबून चालत चालत प्रवास करत इथवर आलो आहे. बायकोच्या अंगात ताप आहे. दोघंही अतिशय दमलेले आहोत. या थंडीत उघड्यावर आमचा निभाव कसा लागणार? रात्री झोपण्यापुरती जागा दिलीत तर आपले फार उपकार होतील.''

ठाकूर म्हणाले, ''तुम्ही कोण आहात?''

रज्जब म्हणाला, ''मी खाटीक आहे.'' त्याच्या चेहऱ्यावर ओशाळलेपणा होता.

ठाकूर रागाने म्हणाले, ''तुला कळतंय का हे कोणाचं घर आहे? तुझी इथं येण्याची हिम्मत तरी कशी झाली?''

रज्जब म्हणाला, ''मला माहीत आहे, की हे राजेसाहेबांचं घर आहे. म्हणून तर आश्रय मागायला इथं आलो.'' आता ठाकूरचा स्वर जरा नरम झाला. स्वत:ला राजा म्हणवून घेण्यात त्यांना धन्यता वाटे.

ते म्हणाले, ''गावात इतर कुणी तुला आसरा दिला नाही?''

''नाही महाराज. खूप प्रयत्न केले. पण माझा धंदा कोणता हे

कळल्यावर कोणी दारातसुद्धा उभं केलं नाही.'' रज्जब दाराबाहेरच्या कोपऱ्यात तसाच चिकटून बसला. पाठीमागे अंगाची जुडी करून बसलेली बायको होती. कण्हत, थंडीनं काकडत ती पार मिटून गेली होती.

ठाकूर म्हणाले, ''ही तंबाखू घे आणि तुझी चिलिम ओढ. अंगात जरा उब येईल. बायकोला या ओसरीवर एका कोपऱ्यात पडून राहण्यास सांग.''

दोघंजण त्वरित आत ओसरीवर आले.

ठाकूर म्हणाले, ''तुम्ही इथून निघून जाणार केव्हा?''

रज्जब म्हणाला, ''उजाडण्यापूर्वीच जाऊ. बरोबर भाकरी बांधून आणल्या आहेत. खाण्यापिण्याचाही प्रश्न नाही.''

ठाकूरनं विचारलं, ''कुठून येत आहात दोघं?''

रज्जब म्हणाला, ''पलिकडच्या गावात कामासाठी गेलो होतो ! ''

''तुझं काम फार वाईट प्रकारचं आहे,'' ठाकूर म्हणाले,

''काय करणार महाराज,

कठिण शब्दे वाईट वाटते, हे तो प्रत्ययास येते । तरी मग वाईट बोलावे ते, काये निमित्य ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय व्यावसायिक विमान चालक महिला (डे कन एअरवेज) **– प्रेमा माथूर**

प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.



पोटासाठी करावं लागतं. परमेश्वरानं प्रत्येकाला कामधंदा नेमून दिला आहे, त्याप्रमाणे करत राहायचं.''

ठाकूर म्हणाले, ''धंद्यासाठी गावाला गेला

होतास. किती पैसे मिळवलेस?''

रज्जब संकोचाने म्हणाला, ''गरीबाला पोटापाण्यापुरते मिळाले. सकाळपर्यंत बायकोचा ताप उतरेल, मग आम्ही निघून जाऊ.'' असं म्हणून दमले भागलेले ते दोघेजण एका कोपऱ्यात झोपी गेले.

इत यात बाहेरचा दरवाजा किलकिला होऊन ठाकूर साहेबांना कोणीतरी बाहेर बोलावलं. ठाकूरसाहेब डो यावरून एक जुनं कांबळं घेऊन बाहेर आले. बाहेरचा आगंतूक हल या स्वरात कुजबुजला, ''राजासाब आज रिकाम्या हातानं आलो आहे. उद्या सायंकाळचा मुहूर्त आहे. काम फत्ते करू.''

ठाकूर म्हणाले, ''मला आजच गरज होती. ठीक आहे, उद्या बघू. उद्यासाठी काही योजलं आहे?''

आगंतुक म्हणाला, ''एक खाटिक पैशाची पिशवी कमरेला बांधून गावात शिरला आहे. आम्ही त्याच्या मागावर होतो; पण तो निसटला. उद्या सकाळी शोधू त्याला. जातोय कुठं ? गावातच कुठेतरी दडला असेल.''

ठाकूर साहेब तिरस्कार दर्शवत म्हणाले, ''कसाईच्या पैशाला हातसुद्धा लावायचा नाही. तो वाईट काम करून मिळवलेला पैसा असतो.''

आगंतुक म्हणाला, ''त्याच्या पैशावर काय 'कसाई' असं लिहिलेलं असतं?''

''पण त्याच्या गुरंढोरं मारण्याच्या धंद्यामुळे तो पैसा दूषित झालेला आहे.''

''पण पैसा तर गिऱ्हाईकांकडून कसायाकडे आलेला आहे. केवळ त्याच्या स्पर्शानं पैसा काही दूषित होत नाही.''

यावर जास्तीचा वाद टाळून ठाकूर साहेबांनी बाहेरच्यांना पिटाळून लावले. आत बघितलं तर कसाई व त्याची बायको शांतपणे झोपले होते. ठाकूरपण झोपी गेले.

सकाळ झाली. रज्जब तसाच ओसरीवर होता. बायकोचा ताप अधिकच वाढला होता. ती एक पाऊलसुद्धा चालू शकत नव्हती. त्या दोघांना बघून ठाकूर चिडून म्हणाले, ''लवकर बाहेर जा. तुम्हाला बघून गावभर चर्चा होईल. मलापण गाववाले कसायाला घरात घेतले, म्हणून दूषणे देतील.'' रज्जब पत्नीसह बाहेर पडला. त्यानं एका झाडाखाली मु काम ठोकला. आता एखादी भाड्याची बैलगाडी बघू लागला. भाड्याची ठरवाठरवी वगैरे होईपर्यंत दुपार कलली. एकदाची गाडी सुरू झाली. गाडीवान लुच्चा होता. पाचसहा मैल पुढे आल्यावर अडवून त्यानं गाडीभाडं वाढवून घेतलं. रात्रीचा मु काम करायची वेळ आली. गाडीवानाचे पैसे घेऊनही आडमुठेपणानं वागणं सुरूच होतं. रज्जब चिडला. म्हणाला, ''अंधार झाला आहे. चुपचाप गाडी ने, नाहीतर हा बघ सुरा. भोसकून टाकीन तुला.'' आता गाडीवान चुपचाप झाला. त्यानं विचार केला, 'जवळच्या गावी वस्तीला गेल्यावर आरडाओरडा करून गाव गोळा करीन. पुढे गाडी घेऊन जाणारच नाही. या खाटकानं खरंच सुरा वगैरे मारला तर?'

गाडी थोडी पुढे आली आणि अंधारात बैल एकदम घाबरून जागेवरच उभे राहिले. रस्त्यात चारपाच लोक अर्धवट चेहरा झाकून हातात लाठ्याकाठ्या घेऊन गाडी अडवून उभे होते. त्यापैकी कोणीतरी ओरडला, ''खबरदार, गाडी इथेच थांबव.''

गाडीवान गाडी सोडून खाली उतरला. म्हणाला, ''मी गाडीवान आहे, भाडं घेऊन चाललो आहे.''

''गाडीत कोण आहे?'' दुसरा म्हणाला, गाडीवानाच्या घशाला कोरड पडली. तोंडातून शब्द फुटेना. रज्जबने एका हातानं कमरेला बांधलेली पैशाची पोटली धरून ठेवली व म्हणाला, ''मी गरीब माणूस आहे. माझ्याजवळ काही नाही, बायको आजारी आहे म्हणून तिला गाडीत घालून चाललो आहे.''

गाडीवान म्हणाला, ''मला सोडून द्या. माझ्याजवळ तर काहीच नाही.''

''मग तुझ्या गाडीत बसलेला कोण आहे?''

''ललितपूरचा एक कसाई आहे,'' गाडीवान म्हणाला. पाठीमागून रज्जबच्या पत्नीचा कण्हण्याचा आवाज आला. त्या

कर्तृत्वाच्या विश्वासावर, अविचल श्रद्धा भ तिबळावर । कळिकाळाशी ट कर देईन, सावरीन कोसळते गगन ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय महिला शल्यविशारद – डॉ. प्रेमा मुखर्जी

प्रायोजक – श्री. शंतनू पटवर्धन, इलिमॉइस, अमेरिका.

लुटारूंपैकी एक म्हणाला, ‘‘तू खरंच कसाई आहेस?’’

‘‘होय महाराज,’’ रज्जब म्हणाला.

त्या व्य तीनं साथीदाराच्या कानात सांगितलं, ‘‘हा रज्जब खाटीक आहे. याला सोडून द्या.’’

साथीदार म्हणाला, ‘‘याच्या डो यात काठी मारूया. खाटीक-बीटीक आपण काही जाणत नाही, आपला पैशाशी मतलब.’’

ती व्य ती म्हणाली, ‘‘त्या पैशाला आपण हातही लावायचा नाही.’’

दुसऱ्या साथीदारानं एक सोटा उगारून रज्जबला पैसाअडका काढून द्यायला सांगितलं. ती व्य ती साथीदाराला म्हणाली, ‘‘खबरदार, त्याला कोणी हात लावाल तर.’’

सर्व साथीदार म्हणाले, ‘‘तुमची बुद्धी वयोमानाने भ्रष्ट होत चालली आहे. हाताशी आलेलं घबाड आपण का म्हणून सोडायचं?’’

ती व्य ती म्हणाली, हा रज्जब माझ्याकडे आश्रयार्थ आला होता, त्याचं रक्षण करणं माझं कर्तव्य आहे. पुढे त्या व्य तीनं सांगितलं, ‘‘सर्वजण आपापल्या घरी जा. प्रवाशांना त्रास देऊ नका.’’ गाडीवानाला बजावलं,‘‘या दोघांना त्यांच्या गावी घरापर्यंत सोडून ये. मध्येच कोठेतरी सोडू नकोस. आणि सर्वांनीच लक्षात ठेवा, की या गोष्टीची कुठेच चर्चा व्हायला नको. यापुढे ही घटना सर्वांनी विसरून जा.’’

सर्व साथीदार काहीसे चिडून म्हणाले, ‘‘राजासाब यापुढे आम्ही कधीच तुमच्याबरोबर येणार नाही, तुमची साथ देणार नाही.’’

राजासाब म्हणाले, ‘‘काही हरकत नाही. माझा मी कसाही निर्वाह करीन. पण एक लक्षात ठेवा, सच्चा बुंदेला तो असतो जो आपल्या आश्रयार्थ आलेल्या शरणार्थीचा कधीच घात करत नाही. मी एक सच्चा बुंदेलखंडी ठाकूर आहे.’’

मूळ हिंदी लेखक – वृंदावनलाल वर्मा
मूळ कथेचे नाव – शरणागत
स्वैर अनुवाद – नीलिमा करमरकर
ब – शशिकिरण, अशोक पथ,
विधी विद्यालय रस्ता, पुणे – ४

पोपट परतुनि आला



शेजारील आकृतीत पोपट आणि पिंजरा यांच्यामधील रेषेवर तुमच्या कंपास पेटीतील पट्टीची लांबीची बाजू ठेवा.

आता तुमचा चेहरा पट्टीच्या इतका जवळ आणा, की तुमचं नाक पट्टीला चिकटेल. काय गंमत होते ते पाहा. आता तुम्हाला पोपट पिंजऱ्याच्या आत जाऊन बसलेला दिसतोय. हो ना? थोडे मागे पुढे होऊन बघितलेत तर तो पिंजऱ्याच्या मध्यभागी बसलेला दिसेल.

पोपटाऐवजी तुम्ही इतर काही चित्रही काढू शकाल.

आपल्याला पोपट पिंजऱ्यात गेल्याप्रमाणे का बरे दिसतो? यातील शास्त्रीय तत्त्व शोधा आणि आम्हाला कळवा.

खोलात डुबी जो घेतो, मोती त्याला मिळतात । बुडण्यास भीत जो असतो, शेवाळ येई हातात ।।

जाणून घ्या : पहिली भारतीय महिला ठसे तज्ज्ञ – **सीता वर्थंबल आणि भ्रांग थंबल भगिनी**

प्रायोजक – मे. सी. व्ही. कांड कन्सलटन्टस् प्रा. लि., पुणे.

आई आणि पर्यावरण

थरथरल्या हातानं
कुंडीतल्या रोपांना पाणी घालणं
हे तुझं नित्याचंच----
''नको गं आई,
अलीकडे नाही झेपत भांडं तुला
राहू दे की---''
या माझ्या बोलण्यावर म्हणायचीस,
''तुम्ही लहान असताना
मनाला अन् हाताला कुठं उसंत होती...?
आता माझी रोपं मोठी झाली.''
असं म्हणतच पुन्हा कुंडीतल्या झाडांना
कुरवाळायचीस..
आई,
तू गेल्यावर आता ते
सारे संदर्भ उलगडू लागलेत....
बघ आता 'वरून',
तुझी सूनसुद्धा, रोपांना पाणी घालू लागलीयं...
चिंटू चा पर्यावरण उपक्रम
पूर्ण करण्यासाठी का होईना...!
आणि पुटपुटत असते,
'आईंच्या' आठवणी सांभाळल्या पाहिजेत...'
नकळत ती सुद्धा
स्वत:मधली 'आई' प्रगल्भ करू पाहतेय...
तू जपलेलं घराचं पर्यावरण
संवर्धित करण्यासाठी
किमान सांभाळण्यासाठी तरी....

– **प्रभाकर साळेगावकर,** 'वसंत मल्हार', समता कॉलनी, माजलगाव 431131

✻ 'छात्र प्रबोधन'ची खालील वैशिष्ट्यपूर्ण पुस्तके संग्रही ठेवा ✻

आम्ही असे घडलो
संपादन : नीलिमा करमरकर
पृष्ठसंख्या : १३६ किंमत : ₹ ८०/-
विविध क्षेत्रांतील २० कर्तृत्ववान व्य तींनी स्वत:च्या जडण-घडणीविषयी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह !

कल्पक बनू या / Be Creative
लेखक : वाच. अशोक निरफराके
पृष्ठसंख्या : १५२ किंमत : ₹ ८०/-
कल्पनाश तीच्या विकासासाठी आवश्यकअसे अनेक कृतिपाठ पुस्तकात दिले आहेत. इंग्रजीतही उपलब्ध किं. रु. १००

प्रेमाचे मैत्रीचे दीप नवे लावूया। आश्वासक नात्याचे बंध जीवनी जोडूया।।

जाणून घ्या : पहिली भारतीय सिनेनिर्माती व दिग्दर्शक महिला – **फातिमा बेगम**

प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.

परीक्षेला सामोरं जाताना...

- डॉ. संज्योत देशपांडे

'परीक्षा' हा शब्द नुसता उच्चारला तर कोणकोणत्या प्रकारच्या भावना तुमच्या मनात उमटतात- भीती, दडपण, काळजी, चिंता...? तुम्हाला या भावनांवर मात करून प्रसन्न मनानं, आत्मविश्वासानं परीक्षेला सामोरं जायचं आहे. हो ना? कसं, ते जाणून घेऊया सोबतच्या लेखातून...

परीक्षा - वर्षाच्या शेवटी (आणि अधून मधून सुद्धा!) आपल्या आयुष्यात घडणारी महत्त्वाची घटना! पण परीक्षा सहज आली आणि गेली, असं मात्र होताना दिसत नाही.

आमच्या शेजारचा सुबोध खरंतर अभ्यासात हुशार! पण परीक्षा म्हटलं, की त्याचा नूरच बदलतो. जसजशी परीक्षा जवळ येऊ लागते, तसतसा तो अस्वस्थ होतो. ध्यानीमनी परीक्षेचेच विचार, छातीत धडधडणं, घाबरल्यासारखं वाटणं, असं बरंच काही त्याला होत राहतं. परिणामत: अभ्यास तयार असूनही परीक्षेत अपेक्षित गुण मिळत नाहीत.

सुबोधची मैत्रिण सीमा सुद्धा परीक्षा जवळ आली की सतत काळजीत! पण तिच्या काळजीचं कारण वेगळं! 'आता परीक्षा जवळ आली आहे, नीट अभ्यास करायलाच हवा, बराचसा झालाय; पण जो राहिलाय त्याची नीट आखणी करायला हवी. गणितातील २ प्रकरणं नीट समजली नाही. ती मला दादाकडून समजून घ्यायला हवी; पण अजून वेळ गेलेली नाहीये,' असा विचार करून ती तयारीला लागते. अभ्यासाचं नियोजन करते.

अभ्यास तयार असो वा नसो, समीर सारख्या मुलांचा प्रकारच वेगळा! परीक्षेबाबत ती अगदीच 'कूल' असतात.

तुमच्यापैकी अनेकजण परीक्षेबाबत यांसारखे वेगवेगळे अनुभव घेत असाल. फेब्रुवारी महिना संपतो. शाळेतले स्नेहसंमेलन, क्रीडा सप्ताह वगैरे धमाल दिवस संपतात आणि शाळेतले शिक्षक, घरी आई-बाबा असे सर्वजण, 'आता दंगामस्ती पुरे!' असं सांगून परीक्षेविषयी बोलू लागतात. आपलं जगच जणू परीक्षामय होऊन जातं. सगळे फ त परीक्षेशी संबंधित प्रश्नच विचारतात..

'झाला का अभ्यास?'

'रीव्हीजन की फस्ट व्हीजन?'

'अरे बापरे तुझा अजून एवढा अभ्यास बाकी आहे...?' हे आणि असेच अनेक प्रश्न!!

खरंतर मनातून आपल्याला सर्वांनाच परीक्षा या गोष्टीविषयी जरा रागच येत असतो... पण परीक्षा मात्र अगदी शेवटपर्यंत आपल्या सोबत प्रवास करत असते.

तर अशा या परीक्षेची आणि आपली मैत्री झाली तर... म्हणजे परीक्षेविषयीची भीतीच आपल्या मनातून गेली तर? किंवा ती भीती कमी करता आली तर! खरंच, किती मजा येईल ना? पण मुळात या परीक्षेचा आपल्या मनात असा बागुलबुवा तयारच का होतो? परीक्षेची भीती वाटण्याचं, त्याचा ताण येण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे परीक्षा आपल्या क्षमतांचं 'मूल्यमापन' करणार असते. ती आपल्याला 'किती येतं, काय येतं' हे तपासून पाहाणार असते. आणि या 'तपासून' पाहाण्याची आपल्याला मनोमन भीती वाटत असते.

'आपल्याला आलंच नाही तर?', 'आपल्याला आठवलंच नाही तर?', 'मला उत्तर येतंच नसलं तर?' मनात असे बरेच विचार- प्रश्न निर्माण होत राहतात. म्हणजे तुम्ही असं लक्षात घ्या की, परीक्षेपेक्षाही परीक्षेविषयीचे विचार खरं तर मनात खूप साऱ्या साशंकता निर्माण करतात. आता बघा हं, परीक्षा तीच; पण सुबोधसारखी मुलं परीक्षेला घाबरतात. सीमासारखी विद्यार्थिनी काळजीपूर्वक अभ्यास करत परीक्षेला सामोरं

जीवनाचे प्रत्येक अंग, शिकवावा महत्त्वपूर्ण उद्योग । काम करावयाची चांग, लाज नसावी विद्यार्थी ।।

जाणून घ्या : भारतीय सिनेमातील पहिली महिला अभिनेत्री - देविका रानी

पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४४

• परीक्षा जवळ येऊ लागली, की परीक्षेचा वास्तववादी दृष्टिकोनातून विचार करा. • स्वत:वर, स्वत:च्या क्षमतांवर स्वत:च्या प्रयत्नांवर विश्वास ठेवा. • योग्य आहार, योग्य विश्रांती घ्या. • विनाकारण जागरण करून मेंदूवर ताण वाढवू नका. • दीर्घ श्वसनाचे व्यायाम करा. त्याने मन एकाग्र होण्यास, ताण कमी होण्यास मदत होते. दीर्घ श्वास घेत श्वासोच्छवास संथ लयीत करा. त्यामुळे जास्तीत जास्त प्राणवायू मेंदूला मिळतो व मन हलकं होण्यास मदत होते. • 'शांत हो,' असं मनाला बजावून स्वयंसूचना द्या. • परीक्षेच्या वेळी विस्मरण झालं, की तो प्रश्न तात्पुरता सोडून द्या. आठवण्यासाठी विशेष प्रयत्न करताना त्या भागाशी संबंधित तासिका, पुस्तकांमधील चित्रं, त ते डोळ्यासमोर आणा. यामुळे उत्तर आठवायला मदत होईल. • 'मला उत्तम यश मिळणारच आहे,' असं मनात म्हणत राहिलं म्हणजे हळूहळू नकारात्मक विचार जाऊन विधायक विचार मनात सुरू होतात. मग प्रश्नपत्रिकेतला एखादा सोपा प्रश्न निवडून त्याचे उत्तर लिहायला लागा म्हणजे आत्मविश्वासाने पुढील प्रश्नपत्रिका पूर्ण करता येईल.

जाते, तर समीरसारख्या मुलांना स्वत:च्या क्षमतांची जाणीवच नसते, परीक्षेचं गांभीर्यच नसतं.

विचार करा बरं, असं का म्हणून? प्रत्येकाच्या मनात परीक्षेविषयी वेगवेगळे विचार घोळत राहतात. म्हणजेच परीक्षेचा ताण निर्माण व्हायला आपल्या मनात येणारे हे 'विचार' कारणीभूत असतात. या विचारांचे परिणाम आपल्या शरीरावरदेखील होत राहतात. कुणाचं डोकं दुखायला लागतं, कुणाला घाम फुटतो, कुणाच्या छातीत धडधडतं, तर कुणाच्या पोटात दुखतं. मग एवढे सगळे परिणाम अनुभवण्यापेक्षा आपण हे परीक्षेचं टेन्शन कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक काहीतरी करायला हवं.

आपण प्रथम लक्षात घेऊया, परीक्षेची भीती त्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून निर्माण होते. परीक्षेला आपण



अगदी जीवन-मरणाचा प्रश्न करतो. अगदी लहानपणापासून आपल्या कळत नकळतपणे आपला असा दृष्टिकोन जोपासला जातो. आपल्या आईबाबांनी, शिक्षकांनी आपल्याला सांगितलेलं असतं, 'अभ्यास केला नाहीस तर नापास होशील' आणि त्या नापास होण्याची म्हणजेच अपयशी होण्याची आपल्याला भीती वाटत असते. मग मला जर परीक्षेसोबत मैत्री करायची असेल, तर माझ्या मनातले परीक्षेबाबतचे हे नकारात्मक विचार मी बदलायला हवेत. त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा...

म्हणजे नेमकं काय करायचं?

'परीक्षा' म्हणजे आपण किती अभ्यास केला आहे, हे तपासण्यासाठीचं 'साधन' आहे. मग आपला आपण केलेल्या तयारीवर विश्वास असतो का ? जेव्हा माझ्या मनात प्रश्न येतो, 'मला परीक्षेत उत्तरं येतील का? ...मला आठवेल का?'...तेव्हा आपण लगेच प्रतिप्रश्न करायला हवा, 'का येणार नाही? माझी तयारी झाली आहे म्हणजे मला न कीच येईल.'

परीक्षा हा विषय बाजूला ठेवून जर विचार केला, तर आपल्या क्षमतांविषयी आपल्याला खात्री असते. पण तीच खात्री नुसतं 'परीक्षा' शब्द उच्चारला की डळमळीत होते. म्हणजेच आपल्या मनातल्या स्वत:विषयी असणाऱ्या साशंकता (विनाकारण निर्माण केलेल्या) आपण कमी करायला हव्यात.

एकूण परीक्षा एक संकट न मानता, ती एक संधी आहे असं माना. आशावादी दृष्टिकोनातून परीक्षेकडे पाहू लागलात तर निश्चितपणे प्रसन्न मनानं, आत्मविश्वासानं तुम्ही परीक्षेला सामोरं जाऊ शकाल. तुम्हा सर्वांना परीक्षेसाठी खूप शुभेच्छा !

– **डॉ. संज्योत देशपांडे**
श्वेता टेरेसेस, ४०/२९ भोंडे कॉलनी,
ऑफ कर्वे रस्ता, एरंडवणा, पुणे 411004

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥
५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

कार्य - प्रात्यक्षिके

Tag No. CP130641 ActiveLink | प्रात्यक्षिकांचा व्हिडीओ पाहा
तपशीलासाठी पृ. क्र. १० पाहा.

यावर्षी ज्ञान प्रबोधिनी आपलं सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. स्वामी विवेकानंदांच्या विचारांचं कृतिरूप प्रात्यक्षिक म्हणजे आपली प्रबोधिनी. प्रचलित शिक्षण प्रणालीत क्रांतिकारी बदल घडवून आणणारी प्रबोधिनी. नेतृत्व गुणांची पायाभरणी शालेय वयापासूनच विकसित करण्यासाठी, नेतृत्व गुणांच्या संवर्धनासाठी छात्र प्रबोधन मासिक, मासिकाशी निगडित शिबिरं, विविध उपक्रम यांमार्फत अनौपचारिक शिक्षण देणारी प्रबोधिनी, गावागावातले पाण्यासारखे मूलभूत प्रश्न सोडवणारी प्रबोधिनी. मानस शास्त्रावर संशोधन करणारी, कर्तव्याची जाणीव असलेले सरकारी अधिकारी घडवणारी, धार्मिक संस्कारांच्या मूळ अर्थाकडे घेऊन जाणारी प्रबोधिनी... अशी प्रबोधिनीची अनेक रूपे आपल्याला माहीत आहेत. पण या सर्वांच्या गाभ्याशी एकच समान धागा आहे. निस्वार्थ वृत्तींनी काम करणारे कार्यकर्ते! असे कार्यकर्ते प्रबोधिनीला कसे बरे मिळाले?

शाळेत विज्ञान शिकवायला आलेल्या शिक्षकांनी पुढे जाऊन गावागावातल्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांसाठी साखरशाळा चालवल्या. अभियंता झालेल्या युवकांनी प्रबोधिनीच्या माध्यमातून पुढे गावकऱ्यांना एकत्र करून अनेक गावातले पाण्याचे प्रश्न सोडवले. अनेक गृहिणी एकत्र आल्या आणि त्यातून 'संवादिनी' गट तयार झाला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या समुपदेशनातून एक चळवळ उभी केली. अशी अनेक उदाहरणे देता येतील. एकुणात काय तर 'आपल्या समोर दिसणारा कोणता तरी देशप्रश्न आपण स्वत: सोडवला पाहिजे,' या प्रेरणेतून अनेक लोक एकत्र आले आणि प्रबोधिनी या संघटनेचं आजचं रूप साकार झालं.

या सगळ्या प्रक्रियेचं नाट्यरूप प्रात्यक्षिक पुण्यातल्या न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर राष्ट्रीय सौर **माघ शके १९३४, २७ जानेवारी २०१३** ला सादर झालं. या प्रसंगी १५० नागरिकांनी देशसेवेची जाहीर प्रतिज्ञा घेतली. 'भारत भाझा देश आहे,' अशी प्रतिज्ञा आपण सगळेच म्हणतो. मग आपण त्याप्रमाणे कामसुद्धा केलं पाहिजे. म्हणून या १५० नागरिकांनी पुरेसा विचार करून, अभ्यास करून देशसेवेची प्रतिज्ञा घेतली. यामध्ये १६ वर्षांच्या युवती पासून ७० वर्षांच्या आजोबांचाही सहभाग होता. या संपूर्ण सोहळ्याचे साक्षीदार झाले ते तब्बल ७००० नागरिक!

कार्यक्रमाची सुरुवात प्रबोधिनीच्या निगडीच्या क्रीडाकुलच्या खेळाडूंनी केली. जोशपूर्ण कुस्ती, कौशल्यपूर्ण योगासने आणि श्वास रोखून धरायला लावणाऱ्या मल्लखांबांच्या प्रात्यक्षिकांनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. नंतर प्रबोधिनीतल्या मनुष्य घडणीच्या प्रक्रियेचे युवक-युवतींनी नाट्यरूप सादरीकरण केले. प्रबोधिनीच्या ५० वर्षांच्या वाटचालीचा आढावा जणू नाट्यरूप प्रात्यक्षिकांतून सादर झाला. 'आव्हान हे ज्योतींना' या पद्यावरील रंगतदार नृत्यानंतर प्रबोधिनीच्या संचालकांनी १५० प्रतिज्ञार्थींना प्रतिज्ञा दिली.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना मा. संचालक श्री. गिरीशराव बापट म्हणाले, 'शरीर सतेज सुंदर झाले पाहिजे. त्याबरोबर आपले अंत:करण सुशोभित झाले पाहिजे. आपल्या देशाच्या प्रगतीसाठी आपल्याला काय करता येईल याचा विचार आपण केला पाहिजे. आणि तसा देशसेवेचा संकल्प सर्वांनीच करावा आणि आपापल्या ठिकाणी राहून देशाच्या उपयोगी होण्याची प्रतिज्ञा घ्यावी; मात्र त्यासाठी संघटित होऊन काम करावे,' असे आवाहन मा. संचालकांनी केले. प्रबोधिनीच्या कामाचे चित्ररूप प्रदर्शनही नागरिकांना या वेळेस बघायला मिळाले.

- आकाश चौकसे
ज्ञान प्रबोधिनी, युवक विभाग, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०

तोच आपुला मित्र खरोखर, दुजाभाव ज्याला नसतो। दर्पण बिंबासम तो अपुली, सुख दु:खे त्याची करतो।।

जाणून घ्या : दूरदर्शनवर बातम्या देणारी पहिली भारतीय वृत्त निवेदिका - **प्रतिमा पुरी**

'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) -द्वारा संवादिनी -२४२०७२२२

थेंबे थेंबे तळे साचे

– एकनाथ आव्हाड

रोज पहाटे ५.३० वाजता ‘भूर...भूर’ असा सुरुवातीला आवाज करून घरातल्या नळाला पाणी यायचं. आणि तो आवाज मला आणि बाबांना दोघांनाही झोपेतून जागं करायचा.

बराच वेळ गेला, सकाळचे ७ वाजत आले तरी आज नळातून कसलाच आवाज नाही. खरं तर आमच्या सगळ्यांच्या तोंडचं पाणी पळालं. पाण्याशिवाय सगळं घरच हवालदिल झालं होतं. तेवढ्यात नळाच्या तोटीतून एक थेंब बाहेर आला. टपोरा... पण तो काही खाली पडलाच नाही. नळाच्या तोटीवरच बसून राहिला.

‘अरे, मधू कुठे पाहतोस तू? मी तुझ्याशी बोलतोय इकडे बघ, नळाच्या तोटीकडे! अरे मी, मी पाण्याचा थेंब बोलतोय... असा घाबरू नकोस मला. मी तुझ्याशी गप्पा मारायला आलोय,’ तो थेंब अचानक बोलू लागला.

मधू आधी गांगरलाच, मग अडखळत म्हणाला,‘‘अरे थेंबा, तू बोलू कसा शकतोस? तुला च क माणसा सारखं बोलता येतं?’’

थेंब म्हणाला, ‘‘हो, कारण मी ‘चमत्कारी’ पाण्याचा थेंब आहे, बरं का! वाटलं तुझ्याशी बोलावं; म्हणून पाण्याच्या मोठ्ठ्या तलावातून, महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रातून, पाण्याच्या मोठ्या पाईपामधून आणि त्यानंतर पाण्याच्या छोट्या पाईपांतून शेवटी आलो तुझ्या नळाच्या तोटीकडे. या एवढ्या प्रवासामुळे मलाही अगदी तहान लागल्यासारखीच झालीये. देतोस का पाणी?

मधू चाचरत म्हणाला, ‘‘तुला आणि तहान?

थेंब म्हणाला, ‘‘अरे, गंमत केली तुझी. बरं, ते जाऊ दे. मला सांग तू कसा आहेस?’’

‘‘तुच बघ मी कसा दिसतोय ते? एकदम पारोसा. पाणी नाही म्हणून आंघोळ नाही. आंघोळ नाही म्हणून आज शाळा नाही. पाणी नसल्यामुळे दिवसाची सुरुवातच एकदम वाईट झाली माझी. ’’

थेंब खळखळून हसला. हसतांना तो आणखी चमकदार दिसला. ‘‘तुला माहितीये का मधू, आज नळाला पाणी का नाही ते? ’’

‘‘कसं माहीत असेल मला बापड्याला?’’

‘‘अरे, या वर्षी पुरेसा पाऊसच पडला नाही, आपल्या राज्यातल्या काही ठिकाणी! त्यामुळे पाण्याचे जलाशय नेहमी इतके पाण्याने भरले गेले नाहीत. जलसाठ्यातच पाणी नसेल तर नळाला पाणी कुठून येणार? म्हणतात ना आडातच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार!’’

मधू आता थेंबाचं बोलणं नीट एकू लागला.

थेंब म्हणाला, ‘‘मधू, अरे पाणी आपली नैसर्गिक साधन संपत्ती आहे. तीचं जतन करणं

सहभागी व्हा ! पुण्यामध्ये मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - द्वारा युवती विभाग-मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

आपलं परम कर्तव्य आहे. पाण्याचा वापर आपण स्वयंपाकासाठी, स्वच्छतेसाठी, पिण्यासाठी, शेतीसाठी पूर्वीपासून करत आलोय. पण मधू आता स्थिती काहीशी वेगळी आहे.''

''कशी काय?'' मधूनं निरागसतेनं विचारलं. ''अरे, आता मोटारी धुण्यापासून ते साखर, कागद, पोलाद अशा लाखो प्रकारच्या वस्तूंच्या निर्मितीसाठी कारखान्यात प्रचंड प्रमाणात पाण्याचा वापर होतो. तुम्ही माणसं मोटारीत बसून मस्तपैकी दूर दूर फिरून येता. पण ही मोटार किती पाणी पिते माहीत आहे तुला?

मधू आश्चर्यचकित झाला. म्हणाला, ''मोटारीला पाण्याची गरज काय? ती तर पेट्रोल, डिझेलवर चालते ना?''

''अरे बाबा, ही मोटारगाडी पेट्रोल, डिझेलवर रस्त्यानं पळते ते नंतर; पण आधी ही मोटारगाडी तयार करायला केवढंतरी पाणी लागते.''

''म्हणजे? मला नाही कळलं हे!''

''अरे मधू, ही मोटारगाडी तयार करण्यासाठी पोलाद, काच, प्लास्टिक यांसारखे अनेक पदार्थ वापरतात. मोटारीच्या कारखान्यातून एक मोटार तयार होऊन बाहेर पडेपर्यंत तिच्या निर्मितीसाठी काही लाख लीटर पाणी वापरलं गेलेलं असतं. अरे मधू एका मोटारीसाठी वापरलेले पोलाद आणि यंत्राचे भाग तयार करताना, प्रत्यक्ष यंत्राचे भाग जुळणी करून मोटार तयार करण्यामध्ये कितीतरी लाख लीटर पाणी लागते. ही झाली मोटार निर्मिती पर्यंतची पाण्याची गरज. आता मोटारीसाठी लागणारे पेट्रोल कच्च्या तेलापासून मिळवताना, प्रत्येक लीटर पेट्रोल शुद्ध करण्यासाठी ५० लीटर पाणी वापरलं जातं. यावरून मोटारीची पाण्याची तहान केवढी मोठी आहे, हे तुझ्या लक्षात आलंच असेल.''

मधू हे सारं अवाक होऊन ऐकत होता.

''मधू, तीच परिस्थिती कमी – अधिक प्रमाणात इतर उद्योगधंद्यांची आहे बरं. कारखान्याची वाढ झपाट्यानं वाढली. या कारखान्यातून बाहेर पडणारे दूषित पाणी अनेकदा नद्यांमध्ये सोडले जाते. हे पाणी मानवास व नद्यांमधील जलचर, प्राणी, वनस्पती, मासे यांच्या जीवास अपायकारक ठरते. आपण म्हणतो,'पाणी, हेच जीवन', परंतु हे दुषित पाणी प्यायल्याने मनुष्य, प्राण्याचे जीवनच धो यात येऊ शकते.

''हो ना!'' मधूला हे सारं पटत होतं.

मधू खेड्यापाड्यातून पाण्याची समस्या आजही फार बिकट आहे रे. अनेक गावांना घडाभर पाण्यासाठी मैलोनमैल चालावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठीच वणवण तर मग शेतीसाठी पाणी कुठून येणार? 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' हा मंत्र घराघरातून कृतीत आणला पाहिजे. तुला माहितीय मधू जर नळातून दर सेकंदाला पाण्याचा एकेक थेंब गळत असेल, तर दर दिवशी ५.२ लीटर म्हणजे आठ दिवसात ३६.४ लीटर पाणी वाया जाते. माणसांनी ब्रशनं दात घासणे, तोंड धुणे, दाढी करणे या कामांमध्ये 'मग' किंवा 'पेल्या'चा वापर करून पाणी वापरल्यास सुमारे अर्धा लीटर पाणी पुरेसं होतं. नळ सतत चालू ठेवून हीच कामे केल्यास २० लीटर पेक्षाही अधिक पाणी वाया जाते. बादली वापरून अंघोळ केल्यास अंघोळीसाठी सुमारे २० लीटर पाणी वापरले जाते. मात्र, कारंज्यासारख्या शॉवरखाली अंघोळ केल्यास सुमारे ८० लीटर पाणी नाहक खर्च होते.''

मधू म्हणाला,''थेंबा, हे वाया जाणारे पाणी माणूस सहजच वाचवू शकतो.''

''हो रे मधू! गळके पाईप, नळ वेळच्या वेळी दुरुस्त केले, पाण्यानं हंडा, बादली भरल्याबरोबर लगेच नळ बंद केला, नळाखालीच कपडे धुणे, भांडी घासणे ह्या गोष्टी थांबवल्या, तर आपण कितीतरी पाणी वाचवू शकतो.

पावसाचे पाणी छपरांवर पडते ते पाणी छपरांवरून पिंपात पडेल अशी व्यवस्था केली, तर आपण पावसाचे हे पाणी स्वच्छतेसाठी वापरू शकतो. 'पाणी अडवा,

पाणी जिरवा' ही योजना योग्यतऱ्हेनं राबविली पाहिजे. शेतीसाठी ठिबकसिंचन, तुषार सिंचन यांचा वापर केला पाहिजे. तसेच झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे. त्याचबरोबर पाण्याचं नियोजन करणं, हेही फार महत्त्वाचे आहे. खरंतर हे सर्व तुम्हा सगळ्यांना माहीत आहेच. मात्र, 'कळतंय पण वळत नाही,' अशी सर्वांची गत झालेली आहे.

मधूला हे सारं पटलं. तो म्हणाला, ''खरंच थेंबा, या छोट्या-छोट्या गोष्टीही पाणी वाचवण्यासाठी फार मोठं काम करू शकतात. पाण्याचा एक थेंबही किती महत्त्वाचा आहे! म्हणतात नं, 'थेंबे थेंबे तळे साचे' हे अगदी खरं आहे !''

– एकनाथ आव्हाड
ए/२०२, भाग्यवान को. हौ. सो.,
खारदेवनगर, एन.जी. आचार्य मार्ग,
चेंबूर, मुंबई-७१

Tag No. CP130654 ActiveLink
व्हिडीओ पाहा
तपशीलासाठी पृ. क्र. १० पाहा.

'इको फ्रेंडली' रंग

दोस्तांनो, धुळवडीला आणि रंगपंचमीला एकमेकांच्या अंगावर निरनिराळे रंग उडवताना खूप धमाल येते की नाही ! पण आजकाल बाजारात मिळणारे रंग कृत्रिमरित्या बनवलेले असतात. त्यात काही घातक रासायनिक द्रव्यं मिसळतात. हे कृत्रिम रंग शरीराला तसेच पर्यावरणाला घातक आहेत. म्हणजे रंगपंचमीची धमाल करू नका असं मुळीच नाही ! तुमच्या आजूबाजूला वेगवेगळ्या प्रकारची पानं, फुलं, फळं, झाडाची सालं आहेत. त्यांचा उपयोग करून 'नैसर्गिक' रंग तयार करा आणि रंगपंचमीचा खरा आनंद लुटा!

• पळसाचं झाड लाल शेंदरी रंगाच्या फुलांनी लगडलेलं तुम्हाला दिसेल. त्याची वाळलेली फुलं पाण्यात घालून उकळा, त्यातून **शेंदरी-पिवळा** रंग निघेल. असाच रंग शेंदरी रातराणी आणि करडईच्या फुलातून आणि सिंदुरियाच्या (बि सा) बियांपासून मिळेल.

• चुना असलेल्या पड या भिंतीवर पानाच्या बेच यातून लाल भडक 'धायटीची' फुलं फुलली असतील. ती घ्या आणि पाण्यात उकळा. पाण्याला **गडद पिवळा लालसर** रंग येईल.

• काष्ठौषधीच्या दुकानात 'मंजीष्ठा' ह्या वनस्पतींची मुळं, 'बारतोंडी' ची सालं व मुळं, 'र तचंदन', 'खैराची' साल मिळेल. हे वेगवेगळ्या भांड्यात पाणी घालून उकळा म्हणजे **पिवळा, शेंदरी, तपकिरी, लाल, करडा** असे कितीतरी रंग मिळतील.

• बाजारात अजूनही 'ओली हळद' मिळत असेल, ती नसेल तर हळकुंड घेऊन पाण्यात भिजत घाला नंतर हळकुंड उकळा. त्यातून **पिवळा** रंग निघेल, हा रंग तर शरीरावरच्या छोट्या जखमाही बऱ्या करतो.

• 'हिरडा' फळ पाण्यात उकळा, त्यातून **गडद तपकिरी, काळा** रंग मिळेल.

• मेंदीची पाने वाटून त्यात पाणी घालून उकळलंत तर **तांबडट, हिरवट** रंग मिळेल.

• र त वाढवणारं बीट तुम्ही खात असाल ना, त्यातलं थोडं बीट किसणीवर किसा आणि पाण्यात घालून उकळा. **तांबडा, किरमिजी** रंग तयार होईल.

• आवळकाठी पाण्यात बराच काळ भिजत टाका, नंतर ती उकळून घेतल्यास, तुम्हाला काळसर रंग मिळेल.

हे तयार केलेले रंग तुम्हाला सात आठ तास टिकवायचे असतील, तर उकळलेलं रंगीत पाणी गार झाल्यावर त्यात तुरटी टाका. पण हो, झाडातून फुलातून रंग काढतांना झाडं ओरबाडू नका. फ त वाळलेलीच, झाडाखाली पडलेली फुलं घ्या. फुललेली ताजी फुले घेतली तर फलधारणा होणार नाही व काही वर्षांनी तीच झाडं दुर्मीळ होतील. म्हणूनच 'इको फ्रेंडली' रंग करताना 'इको फ्रेंडली' राहा.

– डॉ. कांचनगंगा गंधे
४१/६६७, लोकमान्य नगर, पुणे 411030

दिव्या दिव्या अक्षर दे, नवे नवे शब्द दे। उजेडाच्या भावार्थात, आयुष्याचे गाणे दे।।

जाणून घ्या : भारतातील पहिली बुद्धिबळ ग्रँड मास्टर – **कोनेरू हंपी**

सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये - द्वारा छात्र प्रबोधन ☎ २४२०७१७४

मुलांचे पान

दृष्टिकोन आपला आपला...



१.

आज मी फोटो काढण्यासाठी काही सापडते आहे का, ते पाहात होतो. घरभर हिंडलो; पण फोटो काढण्यासारखं विशेष असं काही सापडलं नाही. मी खूप नाराज झालो.

२.

मला 'मोराची चिंचोली' येथे ट्रॅ टरमधून हिंडताना एक मस्त पिसारा फुलवलेला मोर दिसला; पण जवळ कॅमेराच नसल्यानं मी काहीच करू शकलो नाही. कॅमेरा हातात आल्यावर मला लांडोरीचेच फोटो काढावे लागले. माझा मूडच गेला.

३.

जेव्हा सायकल खेळून घरी आलो, तेव्हा गच्चीमध्ये काही फुले उमललेली दिसली; पण दमल्यानं हात स्थिर राहत नव्हता. काही केल्या फुलांचा फोटो काढताच येत नव्हता. मी माझ्यावरच वैतागलो !

या होत्या राजूच्या काही प्रतिक्रिया. यांवरून तुम्हाला जाणवलं असेल, की राजू नेहमी काहीनाकाही कारण काढून कुरकुर करत असतो. त्यावर उपाय मात्र शोधत नाही. आता याच घटना आपण शिवरामच्या दृष्टीकोनातून पाहूया.

१+

आज मला फोटो काढावेसे वाटले, म्हणून मी कॅमेराबाबत बाबांना विचारलं. बाबांनी कारण विचारलं ते सांगितल्यावर त्यांनी कॅमेरा माझ्या हातात दिला. मग मी 'कशाचा फोटो काढू,' याचा विचार करत काही फोटो काढण्यालायक सापडते का, म्हणून घरात हिंडत होतो. मला खरंतर फुलांचे फोटो काढावेसे वाटत होते; पण फुलं कोमेजलेली असल्यानं मी पानांचे फोटो काढले. ते मला खूपच आवडले.

२+

'मोराची चिंचोली'ला ट्रॅ टरमधून मोर पाहायला घोडके काकांच्या घरून निघालो. जेव्हा पिसारा फुलवलेला मोर दिसला तेव्हा लक्षात आले, की आपण कॅमेराच जवळ ठेवलेला नाही. ते मोर इतके सुंदर होते की, त्यांचे फोटो काढता न आल्यानं मला जरा वाईट वाटले; पण परत आल्यावर काकांच्या घराजवळदेखील फोटो काढण्याजोगं बरंच काही मिळालं. त्यामुळे मी खूष झालो.

३+

सायकल खेळून आल्यावर गच्चीवर सुंदर-सुंदर फुलं उमललेली दिसली; म्हणून मी बाबांना कॅमेरा मागितला. जेव्हा फोटो काढायला गेलो, तेव्हा लक्षात आलं, की धाप लागल्याने हात स्थिर राहात नाहीये. मी थोडावेळ थांबलो व श्वासोच्छवास सामान्य झाल्यावर फोटो काढले.

मित्रांनो, आता तुम्हीच १, २ आणि ३ ची १+, २+ आणि ३+ शी तुलना करा. आणि बघा बरं, आपल्याला राजूच्या दृष्टिकोनापासून लांब जाता येतंय आणि शिवरामच्या दृष्टिकोनाजवळ जाता येतंय का ते?

– चि. शौनक हिंगे (इ. ८ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

मधली सुट्टी

'उद्या सर्वांनी गृहपाठाच्या वह्या आणायच्या आहेत.' किंवा 'सुट्टी संपल्यावर लगेच चौथ्या तासाला भूगोल कक्षात PPT पाहण्यास जायचं आहे.' अशा एक ना अनेक सूचना वर्गात अध्यापक सुट्टीच्या आधीची पाच मिनिटं देत असतात. त्याकडे मुलांचं किती लक्ष असतं, हा खरंच संशोधनाचा विषय आहे.

प्रत्येकाला वेगवेगळ्या कारणांसाठी (शिक्षकांना आदरपूर्वक वंदन करून) वर्गाबाहेर पडायचं असतं. ज्या वर्गात शिक्षक गोष्ट सांगत असतील त्या वर्गातील विद्यार्थ्यांना मात्र, 'सुट्टी होऊ नये किंवा गोष्ट संपल्यानंतर व्हावी' असं वाटतं. तर काहींना खेळण्याची घाई असल्यामुळे कधी एकदा होईल मधली सुट्टी, असं होऊन जातं.

'टण् टण् टण् टण् टण्' झाली सुट्टी ! वाजली घंटा एकदाची ! सुट्टीची घंटा वाजल्यानंतर ५ मिनिटं नळावर हात धुण्यासाठी सर्वांची ही अशी झुंबड उडते. ग्रंथालयात वर्तमानपत्र वाचण्यासाठी, पुस्तकं बदलण्यासाठी गर्दी असते. सुट्टीत डबे खाता खाता काहींना गृहपाठाची वही बाईंना पूर्ण करून देण्याची आठवण होते, तर काहींना 'आज खेळाच्या तासाला कोणता खेळ खेळायचा' याचा विचार पडतो. काही मुलं शांतपणे डबा खात असतात, तर काही मुलं पोटाला गिरणी समजून व अन्नाला धान्य समजून बकाणे भरत असतात. कधी एकदाचा डबा संपतो व केव्हा मी मित्रांसोबत खेळतो, असं त्यांना होतं.

मुलांच्या मधल्यासुट्टीत भांडारात गर्दी होते. 'काकू पुस्तक, काकू चॉकलेट, काकू हे, काकू ते,' अशा एक नाही अनेक मागण्या काकूंकडे चालू असतात. कोणी (अति) अभ्यासू विद्यार्थी खेळणं किंवा डबा खाणं सोडून अभ्यास करत असेल, तर 'पुस्तकी कीडा' म्हणून काहीजण त्याची खिल्लीही उडवतात. अग्रणींच्या वर्गात मधल्या सुट्टीत विशेषत: णेशोत्सवात 'आमचा बर्चीचा पाचवा हात शिकवणं चालू आहे,' 'आमचं पथक पहिलं येणार', 'सजावट अशी करुयात', 'या स्पर्धा ठेवूयात!' 'आपली उद्या ११.०० वाजता बैठक आहे' या आणि अशा चर्चांना उधाण येत असतं. जेवणासाठी मुलं-मुली घोळ यानं कोणी मातृमंदिरात, कोणी वर्गात, तर कोणी पारावर बसतात. डब्यात कारलं, फ्लॉवर म्हटलं की काहींची भूकच उडून जाते. मग आवडी-निवडीच्या भाज्यांची देवाणघेवाण होते, नवीन चित्रपट, क्रिकेट यांविषयांच्या चर्चेला ऊत येतो. मधली सुट्टी असते अभ्यासाला परत सुरुवात करण्यापूर्वी घडीभर विरंगुळा म्हणून, असं मला वाटतं.

पुस्तकं बदलणं, वही पेन आणणं, बकाबका डबा खाऊन खेळायला जाणं, शिक्षकांना वह्या देणं, अपूर्णं गृहपाठ पूर्ण करणं, मैत्रिणींना गमतीशीर किस्से सांगणं, स्पर्धेबात चर्चा करणं, अशी मधल्या सुट्टीत करायची भली मोठी यादी ! म्हणून खरं तर तासांच्या मधला वेळ म्हणजे सुट्टी, असे न होता सुट्टीच्या अलिकडे पलीकडे तास आहेत असे व्हायला हवं. आणि म्हणून मधल्या सुट्टीची वेळ दुप्पट केली पाहिजे, असं मला वाटतं.., तुम्हाला काय वाटतं?

या सर्व गोष्टी करता करता मधली सुट्टी केव्हा संपते, हे घंटा वाजल्याशिवाय कळतच नाही. सारे विद्यार्थी आपापल्या वर्गाकडे धाव घेतात. सुट्टी संपल्याचा शेवटचा टोल झाल्यावर पुन्हा नेहमीप्रमाणे सर्वत्र शांतता होते व वर्गात अध्ययन-अध्यापनाचे कार्य सुरू होते. 'मधली सुट्टी नाही,' असा एकही दिवस आपण शाळेत घालवू शकत नाही. काय खरं ना?

कु. पूजा वाबळे (इ. ९ वी)
ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे - ४४

जाणून घ्या : 'वेटलिफ्टिंग' मधे सिडनी येथे ऑलिंपिक पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला - **कर्नम मल्लेश्वरी**
पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका ☎ २४२०७१४५

लेखांक – ३

निर्णय कौशल्य

शैलजा देशमुख

दोस्तांनो, तुम्ही आता मोठ्ठे होत आहात. रोजच्या जीवनात अनेक प्रसंगी तुम्हाला आपले निर्णय आपणच घ्यावेत असं वाटत असेल. तसे तुम्ही घेताही कधी कधी ! कधी ते बरोबर ठरतात, कधी चुकतातही ! यालाच तर निर्णयातील स्वावलंबन म्हणतात. फ त ते निर्णय डोळसपणे घेण्यासाठी थोडा विचार करायला हवा. असेच काही छोटे प्रसंग खाली दिले आहेत. पाहा बरं, कदाचित काही ठिकाणी तुम्हाला तुमचंच प्रतिबिंब दिसेल.

प्रियाच्या भावाचं लग्न होतं. प्रिया आणि निता उत्साहाने आईबरोबर खरेदीला गेल्या. ऐन उन्हाळ्याचे दिवस ! दुकानाची मायानगरी विविध फॅशनच्या, रंगांच्या, पोतांच्या कपड्यांनी सजलेली !

प्रियाचं लक्ष पुन्हा पुन्हा एका ड्रेसकडे जात होतं. अगदी तशाच फॅशनचा ड्रेस करीना कपूरने एका चित्रपटात वापरला होता. शेवटी ती आईला म्हणालीच, ''आई, मला हाच ड्रेस हवाय... 'शरारा' आईनं एकदा तिकडे नजर टाकली. ''प्रिया, किती उकाड्याचे दिवस आहेत. लग्नात हा पायघोळ, झगमगीत कापडाचा ड्रेस किती uncomfourtable वाटेल ! बघ बाई, पुन्हा एकदा विचार कर. त्यातून मला असं वाटतंय हं, त्यात तू अधिकच गोलमटोल दिसशील.''

पण प्रिया काहीच ऐकून घ्यायच्या मन:स्थितीत नव्हती. शेवटी आईनं ड्रेसची किंमत पाहिली – तीन हजार रूपये...तिने शेवटचा निकराचा प्रयत्न केला –''प्रिया, एवढा महागडा एक ड्रेस घेण्याऐवजी आपण दोन ड्रेस घेऊया ना ! एक लग्नासाठी, एक नेहमीसाठी..'' पण प्रियाचा निर्णय ठाम होता. शेवटी आईनं तिच्या हट्टापुढे मान तुकवली.

प्रत्यक्ष लग्नात तो ड्रेस वापरताना आईनं मांडलेले सर्व मुद्दे प्रियाला पटले. पण सांगणार कुणाला? निर्णय तिचा होता ! त्यात तिच्या मावसबहिणीचा शेरा तर तिला खूपच दुखावून गेला, 'मोठी करीना समजते स्वत:ला... आधी आपली अंगकाठी बघ म्हणावं !'

आईच्या सूचना खरंतर रास्त होत्या.पण 'आईचं नाहीच ऐकायचं' या बंडखोरीतून प्रियानं निर्णय घेतला होता. मात्र, यापुढे आपलं स्वास्थ्य, समारंभाचं औचित्य, ड्रेसची किंमत, आपलं रूप इ. सर्व बाजूंचा विचार करून आपण कपड्यांच्या खरेदीचा निर्णय करायला हवा, हा धडा प्रिया नकळत शिकली. याउलट तिची बहीण नीता. 'आई, मी काय घेऊ? हा बरा आहे का? तो घेऊ का?' असा इतका घोळ तिनं घातला, की आई शेवटी वैतागलीच.

एवढ्या साध्या निर्णयाला किती हा वेळ. 'ठरव काहीतरी पट्कन. नाहीतर नंतर म्हणशील 'तू सांगितलंस म्हणून हा ड्रेस घेतला. मला खरंतर नव्हताच आवडला.' आईला या दोघींच्या निर्णयाचा सुवर्णमध्य हवा होता.

***

अन्वयच्या मित्राचा वाढदिवस होता. संध्याकाळी त्यानं पार्टीला बोलावलं होतं. अन्वयचा हट्ट होता त्याच्यासाठी महागडा व्हिडीओ गेम 'गिफ्ट' म्हणून घ्यायचा ! बाबांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. ''अन्वय, इतके पैसे खर्च करायची अजिबात गरज नाही. 'गिफ्ट' काय देता याला महत्त्व नसतं रे ! 'गिफ्ट' देण्यामागच्या भावनेला महत्त्व असतं.'' पण अन्वयचा हट्ट चालूच. शेवटी तो रागारागाने म्हणाला, ''नाही ना देत तुम्ही गेम, मी नाहीच जात वाढदिवसाला.'' बाबांनी त्याच्याकडे अजिबात लक्ष दिलं नाही. अन्वय धुसफुसत घरीच बसून राहिला पार्टीला न जाता.

त्याचवेळी ऋत्विकच्या घरीही हाच संवाद ! मात्र ऋत्विक

कणभर शहाणा! तो पार्टीला गेला आईनं आणलेलं 'गिफ्ट' घेऊन; पण मनात नाराजी ठेवूनच. त्याचं लक्षच नव्हतं पार्टीत. 'मित्रांमध्ये आपलं 'गिफ्ट' लहान दिसेल; मग हसतील ते आपल्याला! कध्धी- ध्कधी म्हणून आमचा हट्ट पुरवत नाहीत आई बाबा'... असं काय न काय मनात येत राहिलं त्याच्या ...

रोहितला मात्र बाबांचं म्हणणं पटलं. तो समाधानानं बाबांनी आणलेलं 'गिफ्ट' घेऊन गेला. किती आत्मविश्वासानं त्यानं पार्टीत मजा केली.

बघितल्यात तिघांच्या तीन तऱ्हा. निर्णय एकाच प्रसंगाचा; पण त्याचा प्रत्येकावर होणारा परिणाम वेगवेगळा. कुणी काय मिळवलं, काय गमावलं, ते तुम्हीच ठरवा.

***

पावसाळ्याचे दिवस होते. समीर आणि त्याची गँग गणिताचा लास संपवून घरी निघाली होती. नुकतेच ते दहावीत गेले होते. त्यांच्या लासमधल्या बारावीच्या मुलांचा ग्रुप कोपऱ्यावर झाडाआड उभा होता. ठिकाण थोडं आडजागीच! फारशी रहदारी नसायची तिथं! कुणीतरी हाक मारली, ''सम्या, या ना इकडे!'' समीरनं पाहिलं शेजारचा तन्मयही त्यांच्यात होता. दोघा-तिघांच्या हातात सिगारेट्स दिसत होत्या. ''यार, बघा तरी किती मजा आहे ते! घेणार का टेस्ट?''

समीर घाबरला आणि म्हणाला, ''चैतन्य, चल बाबा सटकूया. माझ्या आई-बाबांना कळलं तर? माझी काही खैर नाही.''

''ए यार, चल ना जाऊया त्यांच्यात. आपण आता मोठे झालोत, बघूया तरी कसं वाटतं ते!'' रवीची पावलं नकळत तिकडे वळली. रवीच्या नादानं रोहितही गेला.

संदीप मात्र न घाबरता म्हणाला, ''अरे, काय चाललंय? स्वत: सिगारेट ओढता ते ओढता आणि दुसऱ्यांनाही नादी लावता? चल समीर, आपल्याला नाही थांबायचं इथे! सिगारेट ओढणं म्हणजे काही भूषण नाही.''

''ओह... 'मम्माज बॉइज'!, अजून कु कुली बाळंच आहेत.'' कुणीतरी चिडवलं; पण संदीप आणि समीर मात्र तेथून निघून गेले.

मित्रांनो, असा प्रसंग कदाचित तुम्ही अनुभवला असेल. 'सिगारेट ओढून पाहायची की नाही ?' कधीही कुणाशी चर्चा होण्याची श यता नसलेला, आपला आपण निर्णय घ्यायचा हा क्षण... समीरच्या काही मित्रांनी हा अनुभव घ्यायचं ठरवलं. त्याची दोन-तीन कारणं असू शकतात. कुणाला वाटतं आपण आता मोठे झालोत, वयात येतोय, अनेक मोठी माणसं तर सिगारेट ओढतात. घेऊन पाहूया एकदा हा अनुभव. काहीजण थरार किंवा कुतूहलातून प्रयोग करायचा, म्हणून ठरवतात. तर मित्र 'भित्रा, बायकी' असं चिडवतील म्हणून कुणी मित्रांच्या गटाच्या दबावाखाली हा निर्णय घेतात. कुणी आई-वडिलांच्या भीतीने नकार देतात. संदीपसारखा एखादा ही व्यसनाची पहिली पायरी आहे, ही वाईट गोष्ट आहे म्हणून ठामपणे 'नाही' म्हणतो - नकार देतो.

असा एखादा निर्णय आयुष्यात 'आपला आपण घेणं' महत्त्वाचं असतं. त्यासाठी चांगल्या वाईटाचा विचार करायला लागतो, भलत्या कल्पनांवर मात करायला लागते, 'नाही' म्हणायचं धाडस लागतं. मित्रांनो, हेच तर आपल्याला या वयात शिकायचंय.

***

मित्रांनो, तुमच्याहून मोठ्या अतुलची ही गोष्ट! अतुल इंजिनियरिंगची परीक्षा उत्तम गुणांनी पास झाला. आता तो एका कंपनीत अर्थव्यवस्थापनाचं काम करतोय. आज तो खूप मोठ्या हुद्द्यावर एक हुशार, तत्पर अधिकारी म्हणून काम करतोय. एकदा गप्पा मारताना तो सहज म्हणाला,

''मावशी, इंजिनियरिंगला प्रवेश घेण्याचा माझा निर्णय चुकला, हे मला अभ्यास करतानाच कळलं होतं. मला अजिबात आवडत नव्हता तो अभ्यासक्रम!''

''अरे, पण इंजिनिअरिंगला पहिला आलास ना तू?''

''हो मावशी, कारण कोर्स निवडण्याचा निर्णय माझा स्वत:चा होता. आई-बाबांनी लादला नव्हता माझ्यावर! अर्ध्यावर तो बदलणं, आई-वडील करत असलेला आपल्यावरचा खर्च वाया घालवणं, त्यांना घाबरवणं काहीच योग्य वाटलं नाही मला त्यावेळी. मग मी ठरवलं, छान अभ्यास करून आपला निर्णय निभवायचा. मात्र, आयुष्यातलं करिअर निवडताना त्याचा वापर करून योग्य दिशेनं जायचं. हे बोललो नाही मी कधी कुणाला

सातवी ते नववीच्या मुलामुलींसाठी - सामूहिक विद्याव्रत संस्कार -द्वारा संवादिनी ☎ २४२०७२२२

आजपर्यंत! पण आता हवं ते साध्य केल्यावर बोलावंसं वाटलं तुझ्याजवळ!''

मित्रांनो, अतुलचा अनुभव किती बोलका आहे. चुकलेल्या निर्णयावर मात करण्याची क्षमता, विधायक दृष्टिकोन, धैर्य त्याच्यात होतं. पण त्याचबरोबर निर्णय योग्य होण्यासाठी म्हणून निर्णय घेतानाच आपण सर्व बाजूंचा विचार करूया ना! उपलब्ध पर्यायांचा विचार करूया. मोठे निर्णय घेण्याचा आत्मविश्वास छोटे छोटे निर्णय देत असतात. आग्रह, ठामपणा, हट्ट, मनमानी यातली सीमारेषा समजावून घेऊया. म्हणजेच सारासार विचार करुन योग्य निर्णय घ्यायला मदत होईल.

मित्र – मैत्रिणींनो 'निर्णयक्षमता' म्हणजे काय हे तुम्हाला सहज समजावं अशा या छोट्या गोष्टी! तुम्हीही असे अनेक अनुभव घेत असाल. त्याकडे डोळसपणे पाहून अशा निर्णयांच्या क्षणी तुम्हाला काय वाटलं, तुम्ही कोणत्या अनुभवातून गेलात हे जर लिहून पाठवलंत ना, तर ते तुमच्या मित्रांना जास्त जवळचं वाटेल. हो नं ?

– शैलजा देशमुख
सी–१०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे 411009

खुलासा : 'छात्र प्रबोधन' राष्ट्रीय सौर माघ (फेब्रु २०१३) च्या अंकात **'निर्णयातील स्वावलंबन'** या लेखामध्ये, पान क्र. २७ वर शेवटच्या परिच्छेदात (क्र. २ मध्ये) 'तपशीलात अभ्यास करायला शिका. वरवरची माहिती मिळवून, त्या आधारे निर्णय घ्या' असे अनवधानाने छापले गेले आहे. त्याऐवजी **'तपशीलात अभ्यास करायला शिका. वरवरची माहिती मिळवून, त्या आधारे निर्णय घेऊ नका'** असे वाचावे. अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल क्षमस्व!

करून तर पाहा...



आगळी वेगळी शो बटणे



मुलांनो, आपण घरी मोडतोड झालेल्या वस्तू पुन्हा जोडण्यासाठी एम–सीलचा वापर करतो, त्याच्या साहाय्याने भेगा, छिद्रे वगैरे बुजवतो; पण आज मात्र आपण त्याचा अगदी वेगळा उपयोग करणार आहोत. रंगीबेरंगी, नक्षीदार बटणे त्यापासून तयार करून बघूया.

साहित्य : एम–सीलचे एक पाकीट, काळा रंग, गोल्डन, सिल्व्हर, मेटॅलिक फॅब्रिक कलर्स, ब्रश, सुशोभनासाठी छोटे आरसे, रंगीत मणी किंवा पोत.

कृती : एम–सीलचे पाकीट उघडल्यावर त्यात दोन लांबट चौकोनी तुकडे असतील. त्यातील प्रत्येक तुकड्यामधून सुपारीएवढा गोळा काढून घ्या. हे दोन गोळे एकमेकांत पूर्णपणे मिसळून एक मोठा गोळा तयार करा. त्या गोळ्यापासून गोल, त्रिकोणी, आयताकृती अशी वेगवेगळ्या आकाराची चपटी – छोटी मोठी बटणे तयार करा.

गोल मोठे बटण केलेत तर ते एक रुपयाच्या नाण्याइतके जाडसर असेल. या बटणावर छोटे रंगीत मणी किंवा आरसे शोभेसाठी लावा. त्यानंतर बटणे दोन – तीन तास वाळवा. पूर्ण वाळल्यावर बटण काळ्या फॅब्रिक रंगाने रंगवा. त्यावर गोल्डन किंवा मेटॅलिक फॅब्रिक कलरने छान नक्षीकाम करा. बटण वाळण्यापूर्वीच त्याच्या मागे छोटा हूक पालथा चिकटवून टाका. त्यामुळे तुम्हाला ते बटण वेगवेगळ्या कुडत्यावर लावता येईल. कुडत्यावर दोऱ्याने 'लूप' करून ठेवला म्हणजे बटणाची काढ–घाल करणे सोपे होईल आणि वेगवेगळ्या कपड्यांना बटणांमुळे उठाव येईल.

– संगीता केळकर, १३, गीताली, डेक्कन जिमखाना, पुणे 411004

नानाविध रत्नांची कनकाची, असती भूषणे फार। परि विद्यासम एकही, शोभादायक नसे अलंकार।।

जाणून घ्या : दुग्ध क्षेत्रातील संशोधनाबद्दल नॉर्मन बोरलॉग ॲवॉर्ड विजेती पहिली भारतीय महिला **– डॉ. अमृता पटेल**

UPSC, परिक्षा पूर्वतयारी वर्ग - द्वारा स्पर्धा परीक्षा केंद्र ☎ २४२०७१३४

'छात्र प्रबोधन'चा अंक हा खरंतर नुसतेच प्रबोधनपर लेख प्रसिद्ध करणारा अंक नसून, कृतीतून अनुभव देणारा अंक आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाला प्रोत्साहित करणारा, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारा व विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करून घेणारा असा हा 'चालता-बोलता' अंक आहे. अशा अंकाची व्यापकता दिवसेंदिवस वाढत राहो; ही ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाप्रित्यर्थ शुभेच्छा!

- सौ. कविता उमराणी (हायड्रोलिं स - जाहिरातदार)

'छात्र प्रबोधन' मासिकाची मुलांबद्दलची व युवकांबद्दलची तळमळ मला ऐकायला मिळाली व अनेक अंकातून अनुभवायलाही मिळाली. हे मासिक केवळ शहरी मुलांसाठी न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील मुलांपर्यंत पोहचविण्याचा जो खटाटोप आहे! त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. अशा सर्वांग सुंदर मासिकात जाहिरात देऊन आम्हाला खारीची मदत करता येते, हेच आम्ही आमचे भाग्य समजतो.

'छात्र प्रबोधन'चे हे कार्य असेच प्रगती करत राहो, आणि त्यांच्या बरोबरची आमची साथ सतत राहो हीच सदिच्छा.

- शशिकांत कुलकर्णी
(A.T.C. Pvt. Ltd. - जाहिरातदार)

माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

छात्र प्रबोधन
२० वर्षांची वाटचाल

मासिकं, विविध उपक्रम, शिबिरे यांद्वारे 'छात्र प्रबोधन'ने हाती घेतलेली विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकसनाची चळवळ तळागाळापर्यंत पोहोचावी, हा त्यांचा उद्देश खूप प्रामाणिक व सच्चा वाटला. त्यामागचे त्यांचे प्रयत्न, तळमळ, परिश्रम प्रत्ययास येत होते. सध्याच्या युगात आजूबाजूला चांगले आदर्श आढळत नसताना 'छात्र प्रबोधन' मुलांना चांगल्या आदर्शांची ओळख करून देत आहे. हे त्यांचे कार्य राज्यभर, देशभर पोहोचावे यासाठी अल्पशः प्रमाणात का होईना, आम्ही मासिकात जाहिरात देऊन आर्थिक हातभार लावू शकलो; याचे आम्हाला समाधान आहे. 'छात्र प्रबोधन'च्या पुढील वाटचालीला भरभरून शुभेच्छा !

- श्री. नरेंद्र भागवत (किर्लोस्कर ब्रदर्स लि. - जाहिरातदार)

⁕ अभिनंदन ! अभिनंदन ! अभिनंदन ! ⁕

'छात्र प्रबोधन' परिवारातील खालील सन्माननीय लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन !
उत्कृष्ट मराठी वाङमयनिर्मितीसाठी महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या २००११-१२ च्या पुरस्कारांचे ते मानकरी ठरले.

श्री. इंद्रजित भालेराव, श्री. अशोक कौतिक कोळी, श्री. संजय ढोले, श्री. महेश केळूसकर, श्री. महावीर जोंधळे, श्री. अभिजित घोरपडे, श्री. संतोष शेणई, श्री. चंद्रकांत वानखेडे, श्रीमती कविता मेहेंदळे, श्रीमती मंगला गोडबोले

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी
राष्ट्रीय सौर १० फाल्गुन, शके १९३४, १ मार्च २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२ येथे छापून,
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

'कोणत्याही पद्धतीने कॉपी केली तरी कॉपी ती कॉपीच ! उत्तरपत्रिका लिहिताना अशा अवैध मार्गाचा अवलंब करणे हा मोठा गुन्हा आहे. ते पाप आहे. अशा वेळी आपण आपल्या गुरुजनांचा, आपल्या स्वत:चा आणि आपल्या विद्येचा अपमान करत असतो. मुलांनो, कॉपी करण्याच्या क्षुद्र मोहाला तुम्ही कधीही बळी पडता कामा नये. त्यापेक्षा परीक्षेत अपयश आले तरी बेहत्तर !'

'विद्यार्थी मित्रांनो, ज्ञानाची उपासना ही पवित्र आणि उदात्त कृती आहे. याची सुरुवात शाळेत अभ्यास करण्यापासून होते. अभ्यासामुळे बुद्धीला धार येते. अभ्यास न करता परीक्षेत कॉपी करणे, ही अपवित्र आणि विकृत कृती आहे. कॉपी करणे म्हणजे तुम्ही तुमची बुद्धी दुबळी, कमकुवत आहे अशी कबुली देणे होय. स्वाभिमान असलेला कोणीही विद्यार्थी वा विद्यार्थिनी कॉपी करणार नाही. कॉपी करून लबाडीने पास झालात तर आयुष्यभर लबाडीनेच वागाल. तसे करू नका.'

'तुम्ही दुसऱ्याचे कपडे घालता का? दुसऱ्याचे उष्टे खातापिता का ? 'कॉपी' करणे ही त्याहून वाईट सवय आहे. त्यातून असे सिद्ध होते, की तुम्ही स्वतंत्र विचार करू शकत नाही. प्रश्नांची उत्तरे देण्यात स्वावलंबी व्हायला शिका.'

जयंत नारळीकर

आम्ही कॉपी करणार नाही...

...आम्ही कॉपी करू देणार नाही !!

मुलांनी विषयाचा अभ्यास केला नाही म्हणजे त्यांना इतर युक्त्या प्रयुक्त्या सुचू लागतात. कॉपी हा त्यातलाच प्रकार आहे. कॉपी न सापडली तर तो कदाचित पास होईल. पण त्याला विषय कळणार नाही. त्यामुळे कॉपी करणे हे सर्वस्वी मी निषिद्ध मानतो.

'कॉपी करून तुम्ही कदाचित उत्तीर्ण व्हालही. पण जे तुम्ही नाहीत ते आहात या भ्रमातून काय मिळविणार ? ''परीक्षेतलं यश!'' असं तुम्ही म्हणाल. पण काय किंमतीचं हे यश ?

नवीन जगच मुळी कॉपी करण्यासाठी नाही. तुम्ही कमी गुणाचे असलात तरी चालेल ; पण जसे आहात तसेच दिसूद्यात. त्यातूनच फक्त आयुष्यभर पुरणाऱ्या निर्भीडतेची व शौर्याची शिदोरी तुमच्या पाठी येईल. हे धैर्यशाली, शूर व्यक्तिमत्त्व, कॉपी करणाऱ्या चोरट्या माणसापेक्षा उपयोगाचं व आत्मविश्वास देणारं आहे. कॉपी करण्यापेक्षा न करण्याला जास्त शौर्य लागतं ; म्हणून तुम्ही तर ती करू नकाच पण इतरांनाही अजिबात करू देऊ नका.'

परीक्षेत 'कॉपी' करण्याची इच्छा निर्माण होणं ही आपल्याठायी असलेला आत्मविश्वास हरविल्याचं लक्षण आहे. स्वत:चा प्रयत्नवाद आपण गमावून बसतो. कॉपीची ही सवय मग केवळ परीक्षेच्या क्षेत्रापुरती मर्यादित राहात नाही, तर पुढे अनेक क्षेत्रात परावलंबनाची, उसनवारीची भावना प्रबल होऊ लागते.

कॉपी म्हणजे बौद्धिक चोरीच असते. तेव्हा कॉपी करण्यामुळे आत्मविश्वास गमविणं, स्वकतृत्वाला व प्रयत्नवादाला विसरणं, फसवणूक करण्याची प्रवृती जोपासणं आणि 'बौद्धिक चोरी' करण्याचा दुर्गुण अंगी निर्माण करणे होय. परीक्षेत 'गुण'वंत बनण्यासाठी दुर्गुणी बनण्याचा हा मोह कटाक्षाने टाळा आणि स्वप्रयत्नाने खरेखुरे गुणवंत होण्याचा आनंद मिळावा.

सौर फाल्गुन, शके १९३४/मार्च २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

सौर दिनदर्शिका शके १९३४

	मार्च २०१३	फाल्गुन चैत्र
शु.	1	१०
श.	2	११
र.	3	१२
सो.	4	१३
मं.	5	१४
बु.	6	१५
गु.	7	१६
शु.	8	१७
श.	9	१८
र.	10	१९
सो.	11	२०
मं.	12	२१
बु.	13	२२
गु.	14	२३
शु.	15	२४
श.	16	२५
र.	17	२६
सो.	18	२७
मं.	19	२८
बु.	20	२९
गु.	21	३०
शु.	22	चै.१
श.	23	२
र.	24	३
सो.	25	४
मं.	26	५
बु.	27	६
गु.	28	७
शु.	29	८
श.	30	९
र.	31	१०

'ग्रीष्माची चाहूल'

झाडावरची फुले न तोडता त्यांची प्रकाशचित्र काढताना मोठीच कसरत करावी लागते. या चित्रात रंगीत पार्श्वभूमी धूसर (Defused) झाल्यामुळे फुले उठून दिसत आहेत. फूल कशाचं हे ओळखलंत का? ती आहेत पांगाऱ्याची– मार्च महिन्यात फुलणारी ! ग्रीष्मऋतूची चाहूल घेऊन येणारी !! तुम्ही काही खास, वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण फुलांचे फोटो काढले असतील तर 'छात्र प्रबोधन'कडे जरूर पाठवा.

– **महेन्द्र सेठिया**, jpmahen@gmail.com

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 13-6/March 13 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९

या अंकाची किंमत : ₹ १५/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–
प्रकाशन दिनांक :
सौर १० फाल्गुन, शके १९३४
१ मार्च २०१३

www.chhatraprabodhan.org
ई–मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –